# महर्षी दयानंद काय म्हणाले?

गिरीश श्री. बापट

## गिरीश श्री. बापट यांच्या अन्य काही पुस्तिका

| | | |
|---|---|---|
| १) | रामदास काय म्हणाले ?<br>आवृत्ती दुसरी, २००७ | ₹ ६०.०० |
| २) | **The Emerging Novelty in Life, Mind and Society**<br>आवृत्ती पहिली, २००६ | ₹ ३०.०० |
| ३) | महात्मा गांधींचा राष्ट्रधर्म (सत्याचा शोध)<br>आवृत्ती पहिली, २०११ | ₹ ३०.०० |
| ४) | राष्ट्रधर्माचे आचरण (विवेकानंद, महात्मा गांधी आणि ज्ञान प्रबोधिनीतील प्रयोग)<br>आवृत्ती पहिली, २०११ | अंतर्गत वितरणासाठी (मागणी केल्यास कोणालाही उपलब्ध) |
| ५) | **From Formal Education to Man-making**<br>आवृत्ती पहिली, २०१२ | अंतर्गत वितरणासाठी (मागणी केल्यास कोणालाही उपलब्ध) |
| ६) | स्वतःला घडविण्यासाठी उपासना<br>आवृत्ती पहिली, २०१३ | ₹ ३०.०० |

आर्य समाजाचे संस्थापक

# महर्षी दयानंद काय म्हणाले ?

(‘सत्यार्थप्रकाश’ या ग्रंथातील वेच्यांचे संकलन )

**संकलन**

**गिरीश श्री. बापट**

★ ★ ★

(केवळ अंतर्गत वितरणासाठी)

| | | |
|---|---|---|
| प्रकाशक | : | कार्यवाह<br>ज्ञान प्रबोधिनी<br>५१०, सदाशिव पेठ,<br>पुणे ४११०३० |
| दूरभाष | : | (०२०)२४२०७००० |
| ई-मेल | : | contact@jnanaprabodhini.org |
| आवृत्ती पहिली | : | ५०० प्रती |
| प्रकाशन दिनांक | : | सौर पौष १, शके १९३५<br>२२ डिसेंबर २०१३ |
| मुद्रक | : | प्रबोध उद्योग, पुणे |
| मुखपृष्ठ | : | श्री. गिरीश सहस्रबुद्धे |
| मूल्य | : | ₹ ३० |

---

# संकलकाचे मनोगत

महर्षी दयानंदांचे चरित्र व विचार महाराष्ट्रात फारसे परिचित नाहीत. ज्ञान प्रबोधिनीमध्ये जे चार राष्ट्रभक्त संत आदर्श म्हणून स्वीकारले आहेत त्यामध्ये महर्षी दयानंदांचा समावेश आहे. समर्थ रामदास, स्वामी विवेकानंद व योगी अरविंद या इतर तीन राष्ट्रभक्त संतांच्या विचारांचे संकलन ज्ञान प्रबोधिनीने प्रकाशित केले आहे. 'दयानंद काय म्हणाले ?' असे दयानंदांच्या विचारांचे संकलन प्रकाशित करायचे झाले तर त्यात १) महर्षी दयानंदांचे संक्षिप्त चरित्र, २) दयानंदांची पत्रे व भाषणे यातील निवडक विचार, आणि ३) दयानंदांच्या लिखित वाङ्मयातील निवडक विचार, असे तीन भाग असायला लागतील, असे वाटले. प्रस्तुत भाग हा महर्षी दयानंदांच्या लेखनातील निवडक विचारांचे संकलन आहे. दयानंदांच्या समग्र वाङ्मयात बारा-पंधरा लहान-मोठे ग्रंथ आहेत. त्यापैकी 'सत्यार्थप्रकाश' या त्यांच्या मुख्य ग्रंथातून निवडलेल्या वेच्यांचे हे संकलन आहे. हे त्यांच्या विचारांचे सार नाही. तर प्रबोधिनीमध्ये जो राष्ट्र-घडणीचा विचार व काम चालते त्याला पूरक व प्रेरक असेच वेचे हेतुपुरस्सर निवडले आहेत. ते निवडताना दयानंदांच्या एकूण भूमिकेचा विपर्यास होणार नाही एवढी काळजी घेतली आहे.

'सत्यार्थप्रकाश' एकूण चौदा प्रकरणांमध्ये किंवा समुल्लासांमध्ये विभागलेला आहे. त्यातील पहिले दहा समुल्लास 'मंडण' करणारे आहेत. शेवटचे चार समुल्लास 'खंडण' करणारे आहेत. येथे निवडलेले वेचे मुख्यतः पहिल्या दहा समुल्लासातून घेतले आहेत. अकराव्या समुल्लासातील काही वेचेही घेतले आहेत. परंतु ते स्वतंत्रपणे न देता विषयानुसार इतर समुल्लासांतील वेच्यांबरोबरच दिले आहेत. प्रत्येक समुल्लासाच्या सुरुवातीला त्यातील वेच्यांच्या निवडीमागची माझी भूमिका तिरक्या ठशात छापली आहे.

हे वेचे निवडताना काय भूमिका होती हे कळावे म्हणून Jnana Prabodhini : A New Experiment in Education, Volume II या ग्रंथातील The Patriot Saints of India या लेखातील महर्षी दयानंदांशी संबंधित भागाचे मराठी भाषांतरही सत्यार्थप्रकाश मधील वेच्यांच्या आधी दिले आहे.

गिरीश श्री. बापट

## अनुक्रमणिका


★ भारताचे राष्ट्रभक्त संत तीन

**महर्षी दयानंदांचे विचार**

१. **पहिला समुल्लास : ईश्वरनाम व्याख्या**

• ईश्वराची शंभर नावे १-५

• परमेश्वरासारखे होण्याचा प्रयत्न म्हणजेच नामस्मरण

२. **दुसरा समुल्लास : शिक्षण-विचार**

• आई-वडिलांची कर्तव्ये • मुलांचे प्राथमिक शिक्षण ६-८

३. **तिसरा समुल्लास : अध्ययन व अध्यापन**

• विद्या हेच खरे भूषण • चारही वर्णांस शिक्षणाची आवश्यकता ९-११

४. **चवथा समुल्लास : समावर्तन संस्कार व गृहस्थाश्रम**

• समावर्तन • स्वयंवर • माणसांच्या जाती माणसांनी केल्या आहेत १२-१५

• आधी वर्णनिश्चिती मग स्वयंवर • गृहस्थाश्रमातील पंचमहायज्ञ

५. **पाचवा समुल्लास : वानप्रस्थ आणि संन्यास**

• आश्रमांचा क्रम • धर्माची दहा लक्षणे १६-१८

• संन्यासग्रहणाची आवश्यकता • संन्याशांची कर्तव्ये

६. **सहावा समुल्लास : राजधर्म**

• शासनव्यवस्था • दक्षता • करपद्धती १९-२३

• करदात्यांचे रक्षण • न्यायव्यवस्था • राजनीतीचे आधार

७. **सातवा समुल्लास : ईश्वर**

• परमेश्वर कोणता ? • देव कोणते ? • मूर्तिपूजा का नको ? २४-३०

• सजीव देवांची पूजा • शुभगुणकर्मे हीच तीर्थे • ईश्वराचा साक्षात्कार

• ईश्वराची स्तुती • ईश्वराची प्रार्थना • ईश्वराची उपासना

८. **आठवा समुल्लास : सृष्टीची उत्पत्ती**

• सृष्टीचा प्रारंभ • आर्यावर्ताची सद्य:स्थिती ३१-३४

९. **नववा समुल्लास : बंध व मोक्ष विवेचन**

• कर्म, उपासना व ज्ञान हे मुक्तीचे साधन • सदाचरणाने मुक्ती ३५-३६

• दुःखापासून सुटका मिळवणे हा पुरुषार्थ

१०. **दहावा समुल्लास : आचार व अनाचार विवेचन**

• देशाच्या समृद्धीसाठी विदेशप्रवास • संपन्नतेचे अनिष्ट परिणाम ३७-४०

• मूर्ख कल्पनांमुळे सर्वनाश • आपसातील यादवीचा राजरोग

• सर्व संप्रदायांना आवाहन

# भारताचे राष्ट्रभक्त संत

(Jnana Prabodhini : A New Experiment in Education, Vol. II या ग्रंथातील पृष्ठ ३२१-२२ व ३२३-२४ वरील मजकुराचा अनुवाद)

## चार आधारस्तंभ

ज्या कोणा देशभक्ताला किंवा देशभक्तांच्या संघाला मातृभूमीची सेवा करायची आहे, त्यांनी भारतातील राष्ट्रभक्त संतांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. ज्ञान प्रबोधिनी हा देशाचा कायापालट करण्याचा वसा घेतलेल्या देशभक्तांचा एक संघ आहे. म्हणून ज्ञान प्रबोधिनीने देशातील निवडक राष्ट्रभक्त संतांचे विचार व कार्य स्वतः समोर आदर्श म्हणून ठेवले आहे. समाजात मानसिक क्रांती घडविण्यासाठीचे तत्त्वज्ञान व प्रेरक शक्ती म्हणून ज्ञान प्रबोधिनीने त्यांच्या शिकवणुकीचे सार आपल्या समोर ठेवले आहे.

भारतात राष्ट्रसंतांची जी प्रदीर्घ मालिका होऊन गेली त्यामध्ये मध्ययुगातील समर्थ रामदास, त्यानंतरच्या काळातले महर्षी दयानंद व स्वामी विवेकानंद आणि अगदी अलिकडचे श्री अरविंद हे आहेत. भारतीय संस्कृतीचा अभ्यास करून ती समजून घेता यावी यासाठी ज्ञान प्रबोधिनीमध्ये या चौघांची शिकवण प्रातिनिधिक स्वरूपात डोळ्यांसमोर ठेवली आहे. त्यातल्या त्यात अर्वाचीन अशा या चौघांच्या जीवन व तत्त्वज्ञानाचा अर्थ अत्याधुनिक ज्ञानाच्या संदर्भात शोधून त्यातून ज्ञान प्रबोधिनीचा आजचा, उद्याचा व दीर्घकालीन कार्यक्रम ठरत असतो. एखाद्या व्यक्तीचे प्रत्यक्ष काम, त्याची तत्त्वे व त्याच्या योजना यांचे शंभर टक्के अनुकरण किंवा अनुसरण करणे बदलत्या परिस्थितीत उपयोगी असतेच असे नाही. कारण काळाच्या प्रवाहात परिस्थिती आणि तीमधील आव्हाने बदलत असतात. परंतु कामाचा पाया व ध्येय कधी बदलत नाही. तपशील मात्र बदलत असतात.

एका बाजूला छत्रपती शिवाजी महाराज व महाराजा रणजितसिंह यांच्यापासून दुसऱ्या बाजूला ज्ञानेश्वर, कबीर, गुरु नानक व विनोबा यांच्यापर्यंत; विसाव्या शतकाच्या पूर्व भागातील लोकमान्य टिळक, लाला लजपतराय, बिपिनचन्द्र पाल यांच्यापासून त्याच शतकाच्या मध्य भागातील सावरकर, महात्मा गांधी, जवाहरलाल

नेहरू यांच्यापर्यंत **ध्येयमार्गावरील प्रकाशदीपांची यादी प्रदीर्घ आहे.** यापैकी प्रत्येकाचे आणि इतरही अनेकांचे जीवन, कार्य व विचार तपशिलात अभ्यासले पाहिजेत. या अभ्यासातूनच आपल्या देशाच्या इतिहास व संस्कृतीतील उभ्या-आडव्या प्रवाहांचे ज्ञान होऊ शकेल. **या मांदियाळीतील प्रातिनिधिक चार जणांपासून वरील सर्वांच्या शिकवणुकीचा अभ्यास आणि स्वीकार करण्याचा प्रारंभ व्हावा अशी अपेक्षा आहे. प्रारंभी या चौघांची शिकवण अभ्यासण्याचे कारण ते द्रष्टे ऋषी आणि वैराग्यसंपन्न संन्यासी होते हे आहे !!!**

## महर्षी दयानंद सरस्वती

स्वामी दयानंदांचा जन्म सौराष्ट्रातील टंकारा या गावात १८२४ साली झाला. त्यांचे सुरुवातीचे शिक्षण संस्कृत भाषेत झाले. त्यांनी यजुर्वेदाचे पूर्ण अध्ययन केले होते. त्यांनी वयाच्या बाविसाव्या वर्षी घर सोडले आणि समर्थ रामदासांप्रमाणेच देवाच्या शोधासाठी असंख्य प्रयत्न करत अनेक अडचणी सोसल्या; वेदविद्या जाणणाऱ्या प्रख्यात पंडितांच्या सान्निध्यात ते आले. त्यांच्या पायाशी बसून आपले अध्ययन पक्के केले. संपूर्ण उत्तर भारतात त्यांनी प्रवास केला व वयाच्या पंचेचाळिसाव्या वर्षी आपल्या जीवितकार्याला त्यांनी सुरुवात केली.

## सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय गुलामगिरी

स्वामी दयानंदांचे काम सुरू झाले तेव्हा सारा भारत इंग्रजांनी जिंकला होता व पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव पडू लागला होता. ब्रिटिशांनी ज्यांच्याकडून भारताची सत्ता मिळवली होती त्यांचा सत्ता परत मिळवण्याचा निकराचा प्रयत्न १८५७ मध्ये फसला होता. ''इंग्रजांचा पराभव कधीच होऊ शकणार नाही, त्यांची संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे, त्यांचा धर्मही हिंदू धर्मापेक्षा खूप श्रेष्ठ आहे, त्यांची प्रार्थना-मंदिरेही किती भव्य असतात, त्यांच्या सामुदायिक प्रार्थना हेच त्यांच्या यशाचे रहस्य आहे, त्यांचे धर्मशास्त्र आपल्या धर्मशास्त्रापेक्षा श्रेष्ठ आहे, त्यांनी वेदांचा, उपनिषदांचा, महाकाव्यांचा अभ्यासही आपल्यापेक्षा जास्त केला आहे, त्यांचे संस्कृतचे ज्ञानही आपल्यापेक्षा जास्त आहे, त्यांनी लावलेला वेदांचा अर्थ अधिक योग्य आहे, हिंदूंनी त्यांचे पूर्णपणे अनुकरण केल्याशिवाय भारताचा पुनरुद्धार होणे शक्य नाही,'' अशा गैरसमजुतींनी तत्कालीन समाजमन भरून गेलेले होते.

''रामाने पूर्वीच्या काळी वानरांना वर दिला होता की तुम्ही लाल चेहऱ्याचे लोक भारतावर राज्य कराल. तीन-चार हजार वर्षांपूर्वीचे हे वानरच त्यांच्या या जन्मात लाल चेहऱ्याचे इंग्रज बनून भारतावर राज्य करत आहेत. रामाने दिलेल्या वरामुळेच इंग्रज भारत जिंकू शकले. या वरामुळेच त्यांचा पराभव अशक्य आहे,''असाही विचार लोकांमध्ये पसरला होता.

स्वामी दयानंद देवाच्या शोधात देशाटन करत असताना लोकमानस असे हतबल झाले होते. या देशस्थितीच्या अनुभवाने दयानंदांच्या विचारात परिवर्तन झाले. स्वामी विरजानंदांसारख्या गुरूच्या पायाशी बसून त्यांनी जे काही ज्ञान मिळवले होते, त्यातून स्वत:च्या मोक्षाची आणि परमेश्वरदर्शनाची त्यांची इच्छा मागे पडली. भारतीय लोकांच्या हृदयातच ते परमेश्वर शोधू लागले. त्यांना भारतीय समाजाचे संपूर्ण परिवर्तन हवे होते. लोकांना देवासमान बनवूनच हे समाज-परिवर्तन होईल असा निश्चय त्यांनी केला.

## वेदांना सन्मान देऊन त्यांना शिरोधार्य मानणे हेच उत्तर

समर्थ रामदासानी जसे श्रीराम चरित्र हे आपल्या तत्त्वज्ञानाचा पाया बनवले, तसे स्वामी दयानंदांनी आपले तत्त्वज्ञान वेदांच्या आधारावर मांडले. परकीय अभ्यासकांच्या मते वेद हे अलिकडचे व अर्धवट रानटी लोकांनी रचलेले असे होते. स्वामी दयानंदांनी वेदांचे खरे मूल्य जाणले.

ज्यांनी या भूमीमध्ये एक राष्ट्र घडवले अशा आपल्या थोर पूर्वजांचे सखोल आणि शक्तिसंपन्न प्राणतत्त्व म्हणजे वेद हे दयानंदांनी जाणले. दिव्य ज्ञान, दिव्य उपासना व दिव्य कर्म यांची खाण म्हणजे वेद. प्राचीन भूतकाळातील हे प्राणदायी तत्त्व आधुनिक जगामध्ये प्राणसंचार करण्यासाठी दयानंदांनी पुढे आणले. वेदांचे सर्व नकारात्मक अर्थ त्यांनी आपल्या पांडित्याने व स्फूर्तीने दूर सारले आणि संपूर्ण समाजाची रचना वेदांच्या पायावर करता येईल हे अतिशय समर्थपणे दाखवले.

**स्वामी दयानंदांनी मूर्तिपूजेला प्रखर विरोध केला. तसेच ते कोणतीही जात मानत नसत. शिक्षण आणि मालमत्तेच्या बाबतीत स्त्रियांना आणि पुरुषांना समान अधिकार आहेत असे त्यांनी सांगितले. यज्ञ, दैनंदिन उपासना व सामूहिक**

**साप्ताहिक हवन यांचा त्यांनी आग्रहाने पुरस्कार केला. या आचारधर्माने जणू त्यांनी या देशाच्या लोकांमध्ये संघटना-तत्त्वाचेच बीजारोपण केले.**

वेदांप्रमाणेच स्वामी दयानंदांनी इतर धर्मांच्या प्रमाणग्रंथांचाही अभ्यास केला. त्या ग्रंथांमधील असंख्य तर्कदोष त्यांनी दाखवून दिले. पाश्चात्त्य किंवा इतर कोणतीच संस्कृती वैदिक संस्कृतीहून श्रेष्ठ असू शकणार नाही हे त्यांनी समर्थपणे प्रतिपादन केले.

स्वामी दयानंदांनी आर्यसमाज या संघटनेची स्थापना केली. त्यांनी हजारो अनुयायांना प्रेरणा दिली. त्यांच्या मृत्यूनंतरही या अनुयायांनी वैदिक आदर्शांचा प्रचार भारतात आणि विदेशात केला.

दि. ३० ऑक्टोबर १८८३ या दिवशी दिवाळीतील लक्ष्मीपूजनाच्या संध्याकाळी स्वामी दयानंदांचे निर्वाण झाले.

---



जन्म
विक्रम संवत् १८८१, सन १८२४

निर्वाण
विक्रम संवत् १९४०, सन १८८३

निराश निद्रित विमनस्क मनी, विझल्या ज्योति पुन्हा पेटवुनि
स्वधर्म सांगुन, प्रकाश दावुन, भय नाशियले तांडव बनुनि
सरस्वतीचे तुम्ही उपासक, **दयानंद** हे तुमचे नाव
तुमच्या स्मरणे अमुच्या हृदयी, हिंदुत्वाचे स्फुरले गान.

# महर्षी दयानंदांचे विचार

## पहिला समुल्लास : ईश्वरनाम व्याख्या

### निवडीची भूमिका

*महर्षी दयानंदांनी सत्यार्थप्रकाशाची सुरुवात परमेश्वराच्या नावांपासून केली आहे. आपल्या भोवतालच्या ज्या ज्या गोष्टी आपण त्यांच्या पार्श्वभूमीपासून वेगळ्या पाहू शकतो, त्यांची ओळख पटण्यासाठी आणि लक्षात राहण्यासाठी आपण त्यांना वेगवेगळी नावे देतो. वस्तूंना आणि व्यक्तींना जशी आपण नावे देतो तशीच ठिकाणांना, कृतींना आणि भावनांनाही त्या वेगळ्या ओळखू येऊ लागल्यानंतर वेगळी नावे देतो. पाणी या एकाच पदार्थाला तो स्थिर असेल तर वेगवेगळ्या आकारानुसार डबके, तळे आणि सरोवर अशी नावे देतो. पाणी वाहते असेल तर पुन्हा त्याच्या आकारानुसार झरा, ओढा आणि नदी अशी नावे देतो. नेमकी ओळख पटण्यासाठी जेवढे बारकावे शोधता येतील तेवढे शोधून त्या प्रत्येकाला वेगळे नाव देणे ही माणसाची प्रवृत्तीच आहे.*

*हे सगळे जग ज्या शक्तीचे दृश्य कार्यरूप आहे व ज्या शक्तीमुळे ते चालते त्या शक्तीचे वेगवेगळे आविष्कार जगभरच्या वेगवेगळ्या लोकांना लक्षात येत गेले आहेत. त्या प्रत्येक आविष्काराला लोकांनी वेगवेगळी नावे दिली आहेत. या शक्तीची अनेक रूपे आपल्या अजून लक्षात यायची आहेत. जेवढे आविष्कार किंवा रूपे आपल्याला लक्षात आली तेवढी नावे त्यांना दिली.* ***या विश्वशक्तीलाच भारतीय संस्कृती परमेश्वर म्हणते.*** *या परमेश्वराच्या एकेका गुणाला दिलेले एकेक नाव म्हणजे परमेश्वराचेच एकेक नाव असेही भारतीय संस्कृती मानते. महर्षी दयानंदांनी सत्यार्थप्रकाशाच्या पहिल्या समुल्लासात नमुन्यादाखल परमेश्वराची १०० नावे दिली आहेत. पुढे ते असेही म्हणतात की परमेश्वराचे गुण, कर्म आणि स्वभाव अनंत आहेत. त्यानुसार त्याची नावेही अनंत आहेत. हे सांगण्याचा त्यांचा हेतू नावावरून भांडत न बसता किंवा नावासाठी भांडत न बसता ज्याचे ते नाव आहे त्या परमेश्वराची ओळख करून घेणे हे जास्त महत्त्वाचे आहे.*

*या संकलनाच्या पहिल्या प्रकरणात अकराव्या समुल्लासातीलही एक उतारा निवडला आहे. परमेश्वराच्या अनेक गुणांची गुणांनुसार अनेक नावे आहेत. त्यापैकी एकेक नाव निवडून ते नाव परमेश्वराच्या ज्या गुणाचे आहे त्याचे आपण स्मरण करत जावे. त्या नावाचे स्मरण करत त्याला योग्य असे आपले वागणे बनवण्याचा प्रयत्न करत जावा. हेच परमेश्वराचे नामस्मरण आहे; असे महर्षी दयानंद म्हणतात. दयानंदांनी दिलेल्या १०० नावांच्या यादीत सत्य हे देखील परमेश्वराचे एक नाव आहे. सत्याचा अर्थ आपण समजून घ्यावा व त्या अर्थाचा कोणताही प्रकाश आपल्या वागण्यात दिसावा यासाठीच सत्यार्थप्रकाश हा ग्रंथ लिहिण्याचा खटाटोप महर्षी दयानंदांनी केला आहे, असे वाटते.*

(या व पुढील सर्व समुल्लासात पुढे कंसामध्ये दिलेले पान क्रमांक सत्यार्थप्रकाश, मराठी अनुवाद, आर्य समाज, पिंपरी, १९९०, मधील आहेत. सत्यार्थप्रकाशातील वेचे उद्धृत करण्यास मंत्री, आर्य समाज, पिंपरी यांनी अनुमती दिल्याबद्दल त्यांना मनःपूर्वक धन्यवाद. या व पुढील सर्व समुल्लासांच्या सुरुवातीला दिलेली निवडीची भूमिका या पुस्तिकेच्या संकलकाची आहे. त्या मजकुरातही आर्य समाज, पिंपरीकडून आलेल्या सूचनांचा अधिकाधिक समावेश करावयाचा प्रयत्न केला आहे. जेथे संकलकाची व आर्य समाजाची भूमिका वेगवेगळी आहे, तेथे तसा निर्देश केला आहे.)

## सत्यार्थप्रकाशातील वेचे

## ईश्वराची शंभर नावे

समाजामध्ये अनेक लोकांच्या नावावरून त्यांच्या परिस्थितीची कल्पना येत नाही. उदाहरणार्थ, 'नाव सोनूबाई हाती कथिलाचा वाळा' असे असते. परंतु परमेश्वराचे कोणतेही नाव निरर्थक नसते. परमेश्वराची सर्व नावे कोठे गुणदर्शक असतात, कोठे कर्मदर्शक तर कोठे त्याचा स्वभाव दर्शविणारी असतात. जसे 'ॐ खं ब्रह्म' मधील परमेश्वराची सर्व नावे यथार्थ आहेत.

१) परमेश्वर रक्षण करणारा असल्याने 'ओम्', २) तो आकाशाप्रमाणे व्यापक असल्याने 'खम्'आणि ३) तो सर्वांहून मोठा असल्याने 'ब्रह्म' ही ईश्वराची नावे सार्थ आहेत. (पान ८)

याचप्रमाणे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४) दिव्य, | ५) सुपर्ण,★ | ६) गरुत्मान् ,★ | ७) मातरिश्वा,★ | |
| ८) भूमी , | | | | (पान १०) |
| ९) विराट, | १०) अग्नी | | | (पान ११) |
| ११) विश्व, | १२) हिरण्यगर्भ,★ | १३) वायू , | १४) तैजस, | |
| १५) ईश्वर, | १६) आदित्य, | १७) प्राज्ञ, | | (पान १२) |
| १८) मित्र, | १९) वरुण, | | | (पान १३) |
| २०) अर्यमा,★ | २१) इंद्र | २२) बृहस्पती, | २३) विष्णू, | |
| २४) उरुक्रम,★ | | | | (पान १४) |
| २५) सूर्य, | २६) परमात्मा, | २७) परमेश्वर, | २८) सविता, | (पान १५) |
| २९) देव, | ३०) कुबेर, | ३१) पृथिवी, | ३२) जल, | |
| ३३) आकाश, | ३४) अन्न, | ३५) अन्नाद,★ | ३६) अत्ता,★ | (पान १६) |
| ३७) वसू, | ३८) रुद्र | ३९) नारायण, | | |
| ४०) चन्द्र, | ४१) मंगल, | ४२) बुध, | ४३) शुक्र, | (पान १७) |
| ४४) शनैश्चर, | ४५) राहू, | ४६) केतू, | ४७) यज्ञ, | |
| ४८) होता, | ४९) बन्धू, | ५०) पिता, | | |
| ५१) पितामह | ५२) प्रपितामह | ५३) माता, | | (पान १८) |
| ५४) आचार्य, | ५५) गुरू, | ५६) अज, | ५७) ब्रह्मा | |

---

★५) जो उत्तम पालन करतो ★६) ज्याचे स्वरूप महान आहे

★७) जो वायूप्रमाणे बलवान आहे ★१२) ज्याच्यापासून तेजस्वी सूर्य निर्माण होतात

★२०) पाप-पुण्याची योग्य फळे देणारा ★२४) अनंत पराक्रमयुक्त

★३५) सर्वांना ग्रहण करण्यास योग्य ★३६) चराचर जगताला ग्रहण करणारा

| | | | |
|---|---|---|---|
| ५८) सत्य, | ५९) ज्ञान, | ६०) अनंत, ६१) अनादि, | |
| ६२) आनंद, | ६३) सत् , | | (पान १९) |
| ६४) चित्, | ६५) नित्य, | ६६) शुद्ध, ६७) बुद्ध, | |
| ६८) मुक्त, | ६९) निराकार, | ७०) निरंजन, ७१) गणपती, | |
| ७२) विश्वेश्वर, | ७३) कूटस्थ,★ | | (पान २०) |
| ७४) देवी, | ७५) शक्ती, | ७६) श्री, ७७) लक्ष्मी, | |
| ७८) सरस्वती, | ७९) सर्वशक्तिमान्, | ८०) न्यायकारी, | |
| ८१) दयाळू, | | | (पान २१) |
| ८२) अद्वैत, | ८३) निर्गुण, | ८४) सगुण, ८५) अन्तर्यामी, | |
| ८६) धर्मराज, | ८७) यम, | ८८) भगवान, ८९) मनु, | (पान २२) |
| ९०) पुरुष, | ९१) विश्वंभर, | ९२) काल, ९३) शेष, | |
| ९४) आप्त, | ९५) शंकर, | ९६) महादेव, | |
| ९७) प्रिय, | ९८) स्वयंभू, | ९९) कवी, | (पान २३) |
| १००) शिव. | | | (पान २४) |

अशी परमेश्वराची ही शंभर नावे येथे लिहिली आहेत. परंतु याहून वेगळी अशी परमेश्वराची असंख्य नावे आहेत. कारण जसे परमेश्वराचे अनंत गुण, कर्म, स्वभाव आहेत तशी त्याची अनंत नावेही आहेत. त्यापैकी प्रत्येक गुण, कर्म व स्वभाव यांचे एक-एक नाव आहे. म्हणून मी ही जी नावे नमूद केली आहेत ती सागरातल्या थेंबासारखी आहेत. कारण वेदादि शास्त्रांमध्ये परमेश्वराचे असंख्य गुण, कर्म व स्वभाव वर्णिलेले आहेत. ते वाचल्यावर व शिकविल्यावर त्यांची माहिती मिळते; आणि जे लोक वेदादि शास्त्रे वाचतात त्यांनाच इतर पदार्थांचे ज्ञानही पूर्णपणे होऊ शकते.

*(पान २४)*

★७३) स्वतः न बदलणारा सर्वांचा आधार

## परमेश्वरासारखे होण्याचा प्रयत्न म्हणजेच नामस्मरण

धर्मयुक्त कामे करणे हेच मोठे यश असून तेच परमेश्वराचे नामस्मरण होय. ब्रह्म, परमेश्वर, ईश्वर, न्यायकारी, दयाळू, सर्वशक्तिमान् वगैरे नावे परमेश्वराच्या गुणकर्मस्वभावानुसार आहेत. उदाहरणार्थ, सर्वांहून मोठा म्हणून ब्रह्म; ईश्वरांचा ईश्वर म्हणून परमेश्वर; तो सामर्थ्यवान् आहे म्हणून ईश्वर; जो कधीही अन्याय करत नाही, सदैव न्यायच करतो तो न्यायकारी; सर्वांवर कृपादृष्टी ठेवतो म्हणून दयाळू; आपल्या स्वत:च्या सामर्थ्याने साऱ्या जगाची उत्पत्ती, स्थिती व लय करतो, त्यासाठी कोणाचीही मदत घेत नाही, म्हणून सर्वशक्तिमान्; जगातील विविध पदार्थांची निर्मिती करणारा म्हणून ब्रह्मा; सर्वांमध्ये व्याप्त होऊन सर्वांचे रक्षण करतो म्हणून विष्णू; सर्व देवांचा देव म्हणून महादेव; प्रलय करतो म्हणून रुद्र; असा अर्थ व्यक्त करणारी नावे परमेश्वराची आहेत. परमेश्वराचे हे गुण स्वत:मध्ये आणण्याचा माणसाने प्रयत्न केला पाहिजे म्हणजे मोठी कामे करून त्याने मोठे बनावे. त्याने समर्थाहून समर्थ बनावे, आपले सामर्थ्य सतत वाढवावे, कधीही अधर्माचरण करू नये. सर्वांवर दया करावी, आपल्या प्रगतीची साधने सर्व परिपूर्ण बनवावीत. तंत्रज्ञानाचा विकास करून नाना प्रकारची उपकरणे तयार करावीत. साऱ्या जगातील जीवांना आपल्या आत्म्याप्रमाणेच सुखदु:ख होत असते हे ओळखावे, सर्वांचे रक्षण करावे. विद्वानांमध्ये विद्वान बनावे, दुष्कृत्ये करणाऱ्या दुष्टांना शिक्षा करावी आणि सज्जनांची पाठराखणी करावी. अशा प्रकारे परमेश्वराच्या नावांचे अर्थ जाणून घेऊन परमेश्वराच्या गुणकर्मस्वभावानुसार आपले गुणकर्मस्वभाव बनविण्याची धडपड करणे हेच परमेश्वराचे नामस्मरण होय.

*(अकरावा समुल्लास, पान ३३६)*

# दुसरा समुल्लास : शिक्षण-विचार

## निवडीची भूमिका

*नवीन पिढीकडे जुनी पिढी आपल्या गुणांचे संक्रमण दोन प्रकारे करत असते. अनुवंशिक गुणांचा वारसा आई-वडिलांकडून मिळतो, सांस्कृतिक गुणांचा वारसा मिळण्याची व्यवस्था समाजाला मुद्दाम करावी लागते. सत्यार्थप्रकाशाच्या दुसऱ्या समुल्लासात मुलांच्या प्राथमिक शिक्षणाचा विचार केला आहे. महर्षी दयानंदांच्या मते* ***प्राथमिक शिक्षण म्हणजे मुलांना शिक्षकांच्या हातात सोपवण्यापूर्वीचे शिक्षण. हे प्राथमिक शिक्षण आई-वडिलांनीच केले पाहिजे.*** *मुलाला शुद्ध बोलायला शिकवणे, सदाचार शिकवणे, अक्षर ओळख शिकवणे हे आई-वडिलांचेच कर्तव्य आहे. दयानंदांचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ देवनागरी अक्षरे न शिकवता अनेक भारतीय लिप्यांची अक्षरे मुलांना आई-वडिलांनी शिकवावीत असे दयानंदांचे म्हणणे होते. इथे ते मुलगा किंवा मुलगी या दोघांनाही ती पाच वर्षांची होताच मुळाक्षरे शिकवावीत असा मुद्दाम उल्लेख करतात. इतरांशी कसे वागावे हे शिकवताना आई-वडिलांनी विद्वान आणि अतिथींशी कसे वागावे व नोकर-चाकरांशी कसे वागावे हे देखील आपल्या मुलांना शिकवावे असे म्हटले आहे. भूत-प्रेत, फलज्योतिष आणि मंत्र-तंत्र या खोट्या गोष्टींवर मुलांची अंधश्रद्धा बसणार नाही यासाठी भ्रमात गुरफटून टाकणाऱ्या सर्व गोष्टींची माहिती आई-वडीलांनी मुलांना द्यावी; असे दयानंद म्हणतात. प्राथमिक शिक्षणाबाबतचा दयानंदांचा हा विचार अतिशय क्रांतिकारक वाटतो.*

## सत्यार्थप्रकाशातील वेचे

### आईवडिलांची कर्तव्ये

आई-वडील व आचार्य (गुरू) हे तीन उत्तम शिक्षक असतात तेव्हाच माणूस ज्ञानवान बनतो. ज्याचे मातापिता धार्मिक, विद्वान् असतात ती मुले भाग्यशाली होत आणि ते कुळ धन्य होय. मुलांना आईकडून जेवढा उपदेश मिळतो व मुलांवर जेवढे उपकार होतात तेवढे इतर कोणाकडूनही होत नाहीत. आई जशी आपल्या मुलांवर प्रेम करते, त्यांचे कल्याण करू इच्छिते तसे इतर कोणी करत नाही. जी माता गर्भधारणेपासून मुलाची विद्या पूर्ण होईपर्यंत त्याला सुशील बनण्याचा उपदेश करते ती धन्य होय.

*(पान २६)*

### मुलांचे प्राथमिक शिक्षण

मातेने मुलांना नेहमी चांगली शिकवण द्यावी. म्हणजे ती सभ्य बनतील आणि वेडेवाकडे चाळे करणार नाहीत. मूल बोलू लागले की त्याची जीभ कोमल बनून स्पष्ट उच्चार करू शकेल असे उपाय आईने करावेत. ज्या वर्णाचे जे स्थान व प्रयत्न असेल ते तिने मुलांना नीट समजावून सांगावे. उदाहरणार्थ 'प' चे उगमस्थान ओठ असून दोन्ही ओठ जुळवून 'प' चा उच्चार कसा करायचा ते प्रयत्नपूर्वक शिकवावे. ऱ्हस्व, दीर्घ, प्लुत (तीन मात्रांचा स्वर किंवा वर्ण) अक्षरांचे योग्य उच्चार कसे करावेत ते सांगावे. मधुर, गंभीर, सुंदर, स्वर; अक्षर, मात्रा, पद, वाक्य, संहिता, अवसान यांतील फरक त्यांच्या कानांना नीट समजला पाहिजे. मुले थोडी फार बोलू व समजू लागली की त्यांना सुंदर वाणीचा वापर; लहान, थोर, आदरणीय, माता, पिता, राजा, विद्वान् इत्यादींशी कसे बोलावे, कसे वागावे, त्यांच्याजवळ कसे बसावे वगैरे गोष्टी शिकवाव्यात. म्हणजे त्यांच्याकडून कोठेही अयोग्य आचरण होणार नाही आणि सर्वत्र त्यांची प्रतिष्ठा होईल. मुले जितेंद्रिय, विद्याप्रिय, सत्संगप्रिय बनतील असा प्रयत्न करावा. निष्कारण खेळणे, रडणे, हसणे, भांडणे, आनंद व दु:ख करणे, कोणत्याही पदार्थाची लालसा बाळगणे, ईर्ष्या व द्वेष करणे यांची सवय मुलांना लागणार नाही, असा प्रयत्न करावा.

मुलगा किंवा मुलगी पाच वर्षांची होताच त्यांना देवनागरी अक्षरे शिकवावीत. अन्यदेशीय भाषांची अक्षरेही शिकवावीत. त्यानंतर विद्या, धर्म, परमेश्वर यांचा अर्थ

सांगणारे; आणि माता, पिता, आचार्य, विद्वान्, अतिथी, राजा, प्रजा, कुटुंब, भाऊ, बहिणी, नोकर, चाकर यांच्याशी कसे वागावे याचे उत्तम शिक्षण देणारे मंत्र, श्लोक, सूत्रे, गद्य,पद्य त्यांच्याकडून अर्थासहित तोंडपाठ करून घ्यावे. त्यायोगे मुले लबाड माणसांकडून फसविली जाणार नाहीत. विद्या व धर्माविरुद्ध भ्रमात गुरफटून टाकणाऱ्या सर्व गोष्टींचीही (उदा. भूतप्रेत, फलज्योतिष, मंत्र-तंत्र) माहिती त्यांना द्यावी. म्हणजे भूतप्रेतासारख्या खोट्या गोष्टींवर त्यांची अंधश्रद्धा बसणार नाही.

*(पान २७-२८)*

# तिसरा समुल्लास : अध्ययन व अध्यापन

## निवडीची भूमिका

*सत्यार्थप्रकाशाचा तिसरा समुल्लास समाजाने शिक्षणाची व्याख्या कशी करावी यासंबंधीचा आहे. शिक्षक व नातेवाईक यांनी मुलांना पहिली गोष्ट ही शिकवली पाहिजे की* ***दागिने घालून केवळ देहाभिमान आणि आसक्ती वाढते. उत्तम विद्या, शिक्षण, गुण, कर्म आणि स्वभाव हेच खरे दागिने आहेत,*** *हे मुलांना शिकवले पाहिजे. सत्याचा उपदेश आणि विद्यादान यांच्याद्वारे इतरांची दुःखे दूर करण्यातच धन्यता आहे. हे शिकवण्यासाठी मुले आठ वर्षांची होताच त्यांना शाळेत घालावे असे दयानंद म्हणतात.* ***उत्तम आचरण शिकणे हा शिक्षणाचा मुख्य उद्देश आहे आणि उपजीविकेसाठी शिक्षण हा शिक्षणाचा उपउद्देश आहे हा प्राधान्यक्रम दयानंदांच्या मनात स्पष्ट आहे.***

*महर्षी दयानंद वेदप्रणीत धर्माचा पुरस्कार करणारे आहेत. परंतु वेदांचा अर्थ ते तपश्चर्येने आणि योगाभ्यासाने शुद्ध झालेल्या स्वयंप्रज्ञेने व ऋषि-परंपरेनुसार लावतात. त्यामुळे तत्कालीन रूढीच्या पूर्णपणे विरुद्ध असा वेदांचा सत्यार्थ ते सांगतात. ते चातुर्वर्ण्य मानतात, परंतु चारही वर्णांच्या लोकांना शिक्षणाची आवश्यकता आहे असेही सांगतात. फक्त ब्राह्मणांनी विद्याभ्यास केला व इतर वर्णांनी केला नाही तर देशातील विद्या, धर्म, राज्य आणि धन यांची वाढ होणार नाही असे दयानंद स्पष्टपणे सांगतात. यापेक्षाही अधिक स्पष्ट विधान करताना ते म्हणतात की क्षत्रिय, वैश्य व शूद्र लोकच विद्या, धर्म, राज्य व धन यांची वृद्धी करणारे असतात. उपजीविकेची साधने चारही वर्णांची वेगवेगळी असतील परंतु त्यासाठीचे शिक्षण हे शिक्षणाचे उपउद्दिष्ट आहे. विद्या व धर्म यांचा प्रसार हेच शिक्षणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. व ते चारही वर्णांसाठी, सर्व वर्णांच्या स्त्रियांसाठी आणि पुरुषांसाठी, आवश्यक आहे. हा दयानंदांचा विचार क्रांतिकारक आहे.*

*दयानंदांची चातुर्वर्ण्याविषयीची भूमिका त्यांच्या काळाच्या पुढे होती हे कळावे म्हणूनच पुढील वेचे निवडले आहेत. आज त्यांच्यानंतर दीडशे वर्षांनी वर्ण असेलच तर*

*ते चार नव्हे असंख्य आहेत असेच म्हटले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचा स्वधर्म जसा स्वतंत्र असतो तसा प्रत्येकाचा वर्णही स्वतंत्र असतो. पूर्वीच्या चार वर्णांचे मिळण प्रत्येकाच्या नव्या वर्णात असते असेच आता म्हटले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीचा विचार स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असलेली व्यक्ती असाच आता केला पाहिजे. अमुक जातीचा किंवा अमुक वर्णाचा असे व्यक्तीचे वर्णन आता कालबाह्य मानले पाहिजे.*

## सत्यार्थप्रकाशातील वेचे

### विद्या हेच खरे भूषण

मुलांना उत्तम विद्या, शिक्षण, गुण, कर्म आणि स्वभावरूपी आभूषण घालणे हे माता, पिता, आचार्य व नातेवाईक यांचे मुख्य काम आहे. सोने, चांदी, माणिक, मोती, प्रवाळ वगैरे रत्नांचे दागिने घातल्याने माणसाचा आत्मा कधीही सुभूषित होऊ शकत नाही. कारण आभूषणे धारण केल्याने केवळ देहाभिमान व विषयासक्ती वाढते; आणि चोरांची भीती व मृत्यूचीही शक्यता असते. आपण जगात असे पाहतो की अंगावर दागिने घातल्यामुळे दुष्टांच्या हातून मुलादींचा मृत्यूही होतो.

ज्या पुरुषांचे मन विद्येच्या विकासात मग्न असते, जे सच्छील व सुस्वभावी असतात, जे सत्यव्रती असून गर्व व अपवित्रता यांपासून मुक्त असतात, जे इतरांच्या मालिन्याचा नाश करणारे, सत्योपदेश व विद्यादान यांच्याद्वारे संसारी माणसांची दु:खे दूर केल्याने सुभूषित असतात, वेदविहित कर्मांद्वारे परोपकार करण्यात गढून गेलेले असतात, ते पुरुष व त्या स्त्रियाही धन्य होत. म्हणून मुले आठ वर्षांची होताच मुलांना मुलांच्या व मुलींना मुलींच्या शाळेत घालावे. दुराचारी शिक्षक-शिक्षिकांकडून त्यांना शिक्षण न देवविता पूर्ण विद्यायुक्त आणि धार्मिक वृत्तीच्या स्त्री-पुरुष अध्यापकांकडूनच त्यांना शिक्षण मिळेल, असे बघावे. *(पान ३४)*

## चारही वर्णांस शिक्षणाची आवश्यकता

फक्त ब्राह्मणांनीच विद्याभ्यास केला आणि क्षत्रिय, वैश्य, शूद्र या मंडळींनी तो केला नाही तर विद्या, धर्म, राज्य व धन यांची वृद्धी कधीही होऊ शकत नाही. कारण ब्राह्मण केवळ अध्ययन-अध्यापन करून व इतर वर्णीयांकडून उपजीविकेचे साधन मिळवून जगू शकतात. पोटापाण्याच्या साधनाच्या ताब्यात असल्याने आणि इतर वर्णीयांना आज्ञा देण्याचे व यथावत् परीक्षा करून त्यांना शिक्षा देण्याचे सामर्थ्य नसल्याने सर्व वर्ण पाखंडी बनतात; आणि जेव्हा क्षत्रिय, वैश्य व शूद्र विद्वान् बनतात तेव्हा ब्राह्मणही अधिक विद्याभ्यास करतात व धर्माच्या मार्गाने चालतात. शिवाय त्या क्षत्रिय, वैश्य व शूद्रांसमोर ते पाखंडही करू शकत नाहीत. जेव्हा क्षत्रिय, वैश्य व शूद्र अडाणी असतात तेव्हा ब्राह्मण आपल्या मनाप्रमाणे वागतात व इतरांना वाटेल ते करायला लावतात. म्हणून आपले कल्याण व्हावे असे ब्राह्मणांना वाटत असेल तर त्यांनी क्षत्रिय, वैश्य व शूद्रांना वेदादि सत्यशास्त्रांचा अभ्यास करावयास लावण्यासाठी अधिक प्रयत्न करावेत. कारण क्षत्रिय, वैश्य व शूद्र लोकच विद्या, धर्म, राज्य आणि लक्ष्मी यांची वृद्धी करणारे असतात. ते कधी भिक्षांदेही करीत नाहीत. त्यामुळे ते विद्याव्यवहाराच्या बाबतीत पक्षपातीही होऊ शकत नाहीत. जेव्हा सर्व वर्णांमध्ये विद्येचा व सुशिक्षणाचा प्रचार झालेला असतो तेव्हा कोणालाही पाखंडी, अधर्मयुक्त मिथ्या व्यवहार चालविणे शक्य नसते. यावरून असे सिद्ध होते की क्षत्रिय, वैश्य व शूद्रांना नियमानुसार चालविणारे ब्राह्मण व संन्यासी असतात तर ब्राह्मण व संन्यासी यांना सुनियमानुसार चालविण्याचे काम क्षत्रिय, वैश्य व शूद्र यांनी करावयाचे असते. म्हणून सर्व वर्णांच्या स्त्री-पुरुषांमध्ये विद्या व धर्म यांचा प्रचार अवश्य झाला पाहिजे.

*(पान ४९-५०)*

# चवथा समुल्लास : समावर्तन संस्कार आणि गृहस्थाश्रम

## निवडीची भूमिका

*शिक्षण संपल्यानंतर ब्रह्मचर्याश्रमाची सांगता करून विद्यार्थ्यांनी गृहस्थाश्रमात प्रवेश करावा असे स्वामी दयानंद म्हणतात. १८७५ साली दयानंदांनी म्हटले आहे की विवाह स्वयंवर पद्धतीने व्हावेत. विवाहामध्ये मुख्य संबंध वधु-वरांचा असतो, त्यांच्या आई-बाबांचा नाही. त्यामुळे विवाहाचा निर्णय मुलाने व मुलीनेच घ्यावा हे चांगले. जोपर्यंत ब्रह्मचर्य पालन करून अध्ययन पूर्ण केल्यावरच स्वयंवर पद्धतीने विवाह होत असत तोपर्यंत आपल्या देशाची सतत उन्नती होत होती असेही दयानंद म्हणतात. बालविवाह सुरू झाल्यापासून देशाची अवनती होऊ लागली. कारण ब्रह्मचर्याश्रमाकडे दुर्लक्ष होऊ लागले व विद्याभ्यास थांबला असेही दयानंद म्हणतात.*

*दयानंद स्वयंवर पद्धतीचा पुरस्कार करत असले तरी मुलामुलींनी आपल्या वर्णातीलच जोडीदार निवडावा असेही ते सांगतात. परंतु प्रत्येकाचा वर्ण निश्चित करण्याचे काम शिक्षण पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्याची परीक्षा घेऊन करायची जबाबदारी राजाची व विद्वानांची आहे असे दयानंदांचे म्हणणे आहे. वर्ण मनुष्यकृत आहेत;, ईश्वरकृत नाहीत असे त्यांचे स्पष्ट मत आहे. आज एकविसाव्या शतकात स्वधर्माप्रमाणे स्व-वर्ण ही प्रत्येकाने स्वतःचा ठरवावा असे म्हटले पाहिजे असे वाटते.*

*गृहस्थाश्रमामध्ये आयुष्यभर पंचमहायज्ञ करणे हे मुख्य कौटुंबिक कर्तव्य आहे, असे दयानंदांनी सांगितले आहे. पहिल्या ब्रह्मयज्ञामध्ये अध्ययन, अध्यापन, उपासना व योगाभ्यास यांचा समावेश त्यांनी केला आहे. देवयज्ञामध्ये अग्निहोत्र आणि विद्वानांचा सत्संग, पितृयज्ञामध्ये ऋषी, विद्वान, माता, पिता आणि योगी यांची सेवा सांगितली आहे. भूतयज्ञ आणि अतिथीसेवा यांचा पारंपरिक अर्थच त्यांनी दिला आहे.*

## सत्यार्थप्रकाशातील वेचे

### समावर्तन

यथायोग्य ब्रह्मचर्याचे पालन करून, आचार्यांच्या सांगण्याप्रमाणे वागून, धर्मपूर्वक चार, तीन, दोन किंवा एका वेदाचे सांगोपांग अध्ययन करून, जो पूर्ण ब्रह्मचारी राहिला असेल, म्हणजे ज्याचे ब्रह्मचर्य खंडित झाले नसेल अशा पुरुषाने अथवा स्त्रीने गृहस्थाश्रमामध्ये प्रवेश करावा. *(पान ७२)*

### स्वयंवर

विवाहाचा निर्णय मुलाने व मुलीने घ्यावा हे चांगले. आईवडिलांच्या मनात आपल्या मुलामुलींचा विवाह करण्याचा विचार आला असेल तरीही त्यांनी मुलाची किंवा मुलीची संमती घेतल्याशिवाय विवाह ठरवू नये. कारण वधुवरांनी एकमेकांना पसंत केल्यावर विवाह झाल्यास त्यांच्यात फारसा विरोध निर्माण होत नाही; आणि मुलेही चांगली निपजतात. मनाविरुद्ध केलेल्या विवाहाने नेहमीच दु:ख होत राहते. विवाहामध्ये मुख्य संबंध वधू व वर यांचा असतो; आईबापांचा नव्हे. कारण ती दोघे एकमेकांवर अनुरक्त असतील तर त्यांनाच सुख होते; आणि त्यांच्यात विरोध असल्यास त्यांनाच दु:ख भोगावे लागते. *(पान ७७)*

जो पर्यंत अशा प्रकारे सर्व ऋषी मुनी, राजे महाराजे, आर्य लोक ब्रह्मचर्य पालन करून, विद्याध्ययन पूर्ण केल्यावरच स्वयंवर पद्धतीने विवाह करत असत तोपर्यंत या देशाची सतत उन्नती होत होती. परंतु जेव्हापासून ब्रह्मचर्याकडे दुर्लक्ष होऊ लागले, विद्याभ्यास थांबला आणि पराधीन अशा बाल्यावस्थेत आईबापांच्या इच्छेप्रमाणे विवाह होऊ लागले तेव्हापासून या आर्यावर्त देशाची अवनती होऊ लागली. म्हणून ही वाईट चाल बंद करून सज्जनांनी पूर्वीप्रमाणे स्वयंवर विवाहाची प्रथा सुरू केली पाहिजे. आता वर्णानुसार विवाह झाले पाहिजेत आणि वर्णव्यवस्थाही गुण-कर्म-स्वभावानुसार असली पाहिजे. *(पान ७९)*

### माणसांच्या जाती माणसांनी केल्या आहेत

मनुष्य, पशु-पक्षी, वृक्ष, जलचर इत्यादी जाती ईश्वराने निर्मिलेल्या आहेत. पशूंमध्ये

गाई, घोडे, हत्ती वगैरे जाती आहेत. वृक्षांमध्ये पिंपळ, वड, आंबा वगैरे जाती आहेत. पक्ष्यांमध्ये हंस,कावळा, बगळा वगैरे जाती आहेत. जलचरांमध्ये मासे, मगरी वगैरे जातिभेद आहेत.

माणसांमध्ये ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र , अंत्यज हे जातिभेद ईश्वरकृत नाहीत. वर्णाश्रमव्यवस्थेच्या संदर्भात आम्ही या पूर्वी सांगितल्याप्रमाणे गुण-कर्म-स्वभावानुसार वर्ण व्यवस्था मानणे आवश्यक आहे. ती जन्मानुसार समजणे चूक आहे. म्हणून ती मनुष्यकृत आहे असे म्हणावे लागते. माणसाच्या गुणकर्मस्वभावानुसार त्याला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आदी वर्णांची परीक्षा घेऊन त्या-त्या वर्णात टाकणे हे राजाचे व विद्वानांचे काम आहे. *(अकरावा समुल्लास, पान ३९३)*

## आधी वर्णनिश्चिती मग स्वयंवर

शूद्र कुळात जन्मास येऊनही ज्याच्या अंगी ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य यांच्यासारखे गुण, कर्म व स्वभाव असतील तर तो शूद्र ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्य बनतो. याचप्रमाणे ज्याचा जन्म ब्राह्मण, क्षत्रिय किंवा वैश्य कुळात झाला असेल व त्याचे गुण, कर्म, स्वभाव हे शूद्रासारखे असतील तर तो शूद्र बनतो. याचप्रमाणे क्षत्रिय अथवा वैश्य कुळात जन्मलेल्या व्यक्तीचे गुण, कर्म व स्वभाव ब्राह्मण अथवा शूद्र यांच्यासारखे असतील तर ती व्यक्ती ब्राह्मण किंवा शूद्र बनते. याचा अर्थ असा की चार वर्णांपैकी ज्या-ज्या वर्णाचे गुण, कर्म व स्वभाव स्त्री-पुरुषांमध्ये असतील. त्या त्या वर्णाची ती स्त्री किंवा तो पुरुष असे समजावे. *(पान ८२)*

## गृहस्थाश्रमातील पंचमहायज्ञ

बुद्धी, धन व हित यांची वृद्धी करणारी जी शास्त्रे व वेद आहेत त्यांचे नित्य श्रवण व श्रावण (म्हणजे ऐकवणे किंवा प्रवचन करणे) करावे. ब्रह्मचर्याश्रमात ज्यांचे अध्ययन केले असेल ते ग्रंथ स्त्री-पुरुषांनी नित्य वाचावेत व त्यांचे चिंतन करावे. कारण मनुष्य जसजसा शास्त्रांमध्ये पारंगत होत जातो तसतसे त्या विद्येविषयीचे त्याचे विशेष ज्ञान वाढत जाते व अध्ययनात त्याची रुची वाढत जाते. पहिल्या ब्रह्मयज्ञामध्ये वेदादि शास्त्रांचे अध्ययन-अध्यापन करणे, संध्योपासना व योगाभ्यास करणे यांचा समावेश होतो.

दुसऱ्या देवयज्ञामध्ये अग्निहोत्र, विद्वानांचा सत्संग, सेवा, पावित्र्य, दिव्य गुण अंगी बाणविणे, दातृत्व, विद्येची वृद्धी करणे यांचा समावेश होतो. हे दोन्ही यज्ञ दररोज सकाळी व संध्याकाळी करायचे असतात. *(पान ९१-९२)*

तिसरा पितृयज्ञ. त्यामधे पितरांची सेवा करण्याचा समावेश होतो. विद्वान् असे देव, अध्ययन-अध्यापन करणारे ऋषी, माता, पिता आदी वयोवृद्ध, ज्ञानी आणि परमयोगी म्हणजे पितर होत. त्यांची सेवा करणे म्हणजे पितृयज्ञ होय.

*(पान ९२-९३)*

चौथा यज्ञ म्हणजे भूतयज्ञ किंवा वैश्वदेव. पाकशाळेमध्ये भोजनासाठी जे जे पदार्थ तयार झाले असतील त्यांचे सहा भाग जमिनीवर ठेवावेत. ते भाग कुत्री, पापी, चांडाळ, पापरोगी, कावळे व किडे इत्यादींना खाऊ घालावेत. पाकशाळेत अदृश्य जीवांची नकळत जी हत्या होते तिचे परिमार्जन किडामुंग्यांना अन्न खाऊ घातल्याने होते.

*(पान ९४-९५)*

पाचवी अतिथीसेवा. ज्याच्या येण्याची तिथी म्हणजे दिवस, वेळ निश्चित नसते त्याला अतिथी असे म्हणतात. तो केव्हाही अकस्मात येतो. धर्मप्रचारक, सत्योपदेशक, सर्वांवर उपकार करण्यासाठी सर्वत्र हिंडणारा, पूर्ण विद्वान, परमयोगी, संन्यासी असा जो पुरुष अकस्मात् गृहस्थाच्या घरी येतो त्याला अतिथी असे म्हणतात. त्याला सत्कारपूर्वक आसनावर बसवावे. त्याला उत्तमोत्तम पदार्थ खाण्यास व पिण्यास द्यावेत आणि त्याची सेवा-शुश्रूषा करून त्याला प्रसन्न करावे. त्यानंतर त्यांचेकडून ज्ञानविज्ञानाच्या गोष्टीतून धर्म, अर्थ, काम व मोक्ष यांची प्राप्ती होईल अशा उपदेशाचे श्रवण करावे व त्यानुसार आपल्या आचरणातही बदल करावा. *(पान ९५-९६)*

# पाचवा समुल्लास : वानप्रस्थ आणि संन्यास

## निवडीची भूमिका

*पाचव्या समुल्लासामध्ये गृहस्थाश्रमानंतरच्या वानप्रस्थाश्रमाचा आणि संन्यासाश्रमाचा उल्लेख केला आहे. मनुस्मृतीतील धर्माची दहा लक्षणे चारही आश्रमांतल्या लोकांसाठी आहेत. परंतु संन्याशांसाठी अकरावे लक्षण सांगितले आहे ते म्हणजे वरील दहा लक्षणांचे स्वतः आचरण करून ते इतरांनाही समजावून सांगणे व त्यांना आचरण करण्यास सांगणे.*

***दयानंदांच्या दृष्टीने भौतिक ज्ञान शिकवण्याचे काम ब्रह्मचारी, गृहस्थ व वानप्रस्थी यांचे आहे तर धर्म शिकवण्याचे (त्यामध्ये आध्यात्मिक ज्ञानही आले) काम संन्याशांचे आहे.***

*शरीरामध्ये जे डोक्याचे स्थान आहे ते आश्रमांमध्ये संन्यासाश्रमाचे आहे, असे संन्याशांच्या कामाचे महत्त्व जसे दयानंदांनी सांगितले तसेच **जे संन्यासी सत्योपदेश व सत्यशास्त्रांचा प्रचार करत नाहीत ते या जगात भाररूप आहेत असेही दयानंद म्हणतात.***

## सत्यार्थप्रकाशातील वेचे

### आश्रमांचा क्रम

मनुष्यांनी ब्रह्मचर्याश्रम समाप्त केल्यावर गृहस्थाश्रमात प्रवेश करावा. तो संपल्यावर वानप्रस्थाश्रम स्वीकारावा व नंतर संन्यास घ्यावा, हे क्रमानुसार आश्रमाचे विधान आहे. *(पान ११८)*

## धर्माची दहा लक्षणे

१) नेहमी धैर्य बाळगणे. २) निंदा-स्तुती, मानापमान, हानी-लाभ इत्यादी दु:खांमध्ये सहनशील राहणे. ३) मनाला सदैव धर्माचरणासाठी प्रवृत्त करणे आणि अधर्मापासून परावृत्त करणे, अधर्माचरणाची इच्छाच मनात निर्माण होऊ नये असा प्रयत्न करणे. ४) चोरी न करणे. मालकाच्या परवानगीशिवाय लबाडीने, फसवून, विश्वासघाताने वाईट कृत्ये करून, वेदविरुद्ध उपदेश करून दुसऱ्यांच्या वस्तूंचा अपहार करणे ही चोरी होय. चोरी न करणे हेच अस्तेय होय. ५) राग, द्वेष व पक्षपात सोडून अंत:शुद्धी करणे आणि पाणी, माती, मार्जन इत्यादींद्वारे बाह्य पावित्र्य साध्य करणे. ६) इंद्रियांना अधर्माचरणापासून परावृत्त करून त्यांना धर्माच्या मार्गाने चालविणे. ७) मादक द्रव्ये, इतर बुद्धिनाशक पदार्थ, दुष्टांची संगत, आळस, प्रमाद, आदी दोषांचा त्याग करून, श्रेष्ठ पदार्थांचे सेवन व सज्जनांची संगती, योगाभ्यास, धर्माचरण, ब्रह्मचर्य आदी शुभ कर्मांनी बुद्धीचे सामर्थ्य वृद्धिंगत करणे. ८) पृथ्वीपासून परमेश्वरापर्यंत असणाऱ्या सर्व पदार्थांचे यथार्थ ज्ञान मिळविणे आणि त्यापासून आपले यथायोग्य कल्याण करून घेणे. सत्य जसे आत्म्यात असेल तसे ते मनात आणणे, जसे सत्य मनात असेल तसेच आचरणात आणणे, ही विद्या होय. याहून जी विपरीत ती अविद्या होय. ९) जो पदार्थ जसा असेल त्याला तसाच समजणे, तसेच बोलणे व तसेच करणे म्हणजे सत्य होय. १०) क्रोधादी दोषांचा त्याग करून शांतता वगैरे गुणांचे ग्रहण करणे. ही धर्माची दहा लक्षणे आहेत. या दशलक्षणयुक्त, पक्षपातरहित, न्यायाचरण युक्त धर्माचे आचरण चारही आश्रमांतील लोकांनी करावे. या वेदोक्त धर्मानुसार स्वत: आचरण करणे आणि इतरांना समजावून सांगून आचरण करण्यास प्रवृत्त करणे हा संन्याशांचा विशेष धर्म आहे. *(पान १२५-१२६)*

## संन्यासग्रहणाची आवश्यकता

ज्याप्रमाणे शरीरामध्ये मस्तकाची आवश्यकता असते, त्याचप्रमाणे आश्रमांमध्ये संन्यासाश्रमाची आवश्यकता असते. कारण त्या आश्रमावाचून विद्या व धर्म यांची वाढ होऊ शकत नाही. इतर आश्रमांमध्ये विद्याग्रहण, गृहकृत्ये, तपश्चर्या आदी त्या त्या आश्रमातील कर्तव्ये करावी लागत असल्यामुळे सवड फार कमी मिळते. नि:पक्षपाती

वर्तन ठेवणे तर आश्रमांमध्ये अवघड असते. संन्यासी जसा सर्वतोमुक्त होऊन जगावर उपकार करतो तसा इतर आश्रमातील मनुष्य करू शकत नाही. कारण संन्याशाला सत्यविद्यांच्या योगे पदार्थांच्या विज्ञानाची उन्नती करण्यास जेवढा वेळ मिळतो तितका इतर आश्रमातील व्यक्तीला मिळू शकत नाही. परंतु जो ब्रह्मचर्याश्रमातून संन्यासी होऊन जगाला सत्याचे शिक्षण देतो व त्याद्वारे जगाची जेवढी उन्नती घडवून आणू शकतो तेवढी गृहस्थ अथवा वानप्रस्थ या आश्रमांतून संन्यासाश्रमात प्रविष्ट होणारा करू शकत नाही. *(पान १२६ - १२७)*

## संन्याशांची कर्तव्ये

वैदिक कर्मे ही धर्मयुक्त सत्य कर्मे असतात. ती संन्याशांनीही अवश्य केली पाहिजेत. भोजन, आच्छादन वगैरे कर्मे ते टाळू शकतात काय ? जर ही कर्मे सुटू शकत नसतील तर उत्तम कर्मे सोडल्याने ते पतित व पापभागी होणार नाहीत काय ? हे संन्यासी गृहस्थांकडून अन्नवस्त्रादी घेतात त्यामुळे धर्मोपदेशाच्या रूपाने त्यांच्या त्या उपकाराची परतफेड करणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. ते कर्तव्य त्यांनी केले नाही तर ते महापापी होणार नाहीत काय ? ज्या डोळ्यांनी दिसत नाही व कानांनी ऐकू येत नाही ते डोळे व कान असून नसल्यासारखेच असतात. त्याचप्रमाणे जे संन्यासी सत्योपदेश आणि वेदादी सत्यशास्त्रांचा विचार, प्रचार करीत नाहीत, तेही या जगात व्यर्थ, भाररूप आहेत. *(पान १२८)*

# सहावा समुल्लास : राजधर्म

## निवडीची भूमिका

*दयानंदांनी राजे व राजपुरुषांसाठी या समुल्लासामध्ये जे काही सांगितले आहे ते आजच्या काळात लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकारी यांना लागू होऊ शकते. दयानंदांनी मुख्यतः शासनाची कर्तव्ये व शासनव्यवस्था यासंबंधीचे विचार या समुल्लासात मांडले आहेत. धर्मविचार मांडणाऱ्या ग्रंथात हा विषय आल्यावर आश्चर्य वाटू शकते, कारण आज धर्माची व्याख्या उपासनापंथ किंवा संप्रदाय इतकी संकुचित झाली आहे. परंतु धर्माची पारंपरिक भारतीय व्याख्या '**अभ्युदय आणि निःश्रेयस साधून व्यक्तिगत जीवन आणि समाज जीवन संतुलित करून जो समाजाला स्थैर्य देतो व व्यक्तीला पूर्णत्वाची प्रेरणा देतो तो धर्म** ' अशी आहे. हल्ली ज्याला विकास म्हणतात तो मुख्यतः भौतिक विकास असतो. भौतिक विकासाला नैतिक विकासाची जोड दिली म्हणजेच व्यक्तिगत चारित्र्य व सामाजिक चारित्र्य यांची जोड दिली की अभ्युदय होतो. समाजाच्या भौतिक आणि नैतिक विकासाशिवाय व्यक्तीचा विकास अपुरा राहतो. समाजाचा अभ्युदय झाला म्हणजे प्रत्येक व्यक्तीला शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकासाबरोबर आत्मिक विकासाची ओढ लागते. त्यातून व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाला पूर्णत्व येते म्हणजे त्याला निःश्रेयस प्राप्त होते.*

*सध्याची भाषा विकसित आणि विकसनशील समाजांची आहे. भारतीय विचारानुसार एखादा समाज अभ्युदित आहे की अभ्युदयशील आहे हे पाहिले पाहिजे. अभ्युदित समाजात शासनव्यवस्था, शासक, कायदा आणि न्यायव्यवस्था यांची गरजच नसते असा आदर्श सांगितला आहे. हा आदर्श भारतात किंवा जगातील कोणत्याही विकसित देशात दिसत नाही. अभ्युदयशील समाजामध्ये मात्र शासनव्यवस्था, शासन, कायदा व न्यायव्यवस्था या सगळ्यांची गरज असते. कारण व्यक्तिगत व सामाजिक चारित्र्य पूर्ण घडलेले नसताना स्वार्थी आणि आत्मकेंद्रित लोक इतरांवर अन्याय करू शकतात आणि त्यांचे शोषणही करू शकतात.*

*यामुळेच शासनव्यवस्था, सरकारी नोकर व न्यायाधीश यांच्या बाबतीत घेण्याची दक्षता, करपद्धती, करदात्यांचे रक्षण, अधिकारी लोकांना देण्याच्या शिक्षणासंबंधी धोरण आणि राजनीतीचे आधार या सगळ्या बाबतचे विवेचन समाजाच्या अभ्युदयासाठी म्हणजेच धर्मसंस्थापनेसाठी दयानंदांनी केले आहे.*

## सत्यार्थप्रकाशातील वेचे

### शासनव्यवस्था

महाविद्वानांना विद्यासभेचे अधिकारी बनवावे. धार्मिक विद्वानांना धर्मसभेचे अधिकारी बनवावे, व प्रशंसनीय धार्मिक पुरुषांना राजसभेचे सभासद बनवावे; आणि त्यामध्ये सर्वोत्तम गुणांनी, कर्मांने व स्वभावाने युक्त महान् पुरुष असेल तर त्याला राजसभेचा सभापती मानून सर्व प्रकारे सर्वांनी आपली उन्नती करावी. तिन्ही सभांच्या संमतीने राजनीतीचे उत्तम नियम करावेत आणि त्या नियमांनुसार सर्व लोकांनी वागावे. सर्वांच्या संमतीने सार्वजनिक हिताची कामे करावीत. माणसाने सर्वांचे हित करण्यासाठी 'परतंत्र' असावे आणि स्वत:च्या कामाच्या बाबतीत 'स्वतंत्र' राहावे.

*(पान १३४)*

कुणा एका विशिष्ट व्यक्तीला स्वतंत्र राज्याचा अधिकार देता कामा नये. परंतु सभापती असणाऱ्या राजाच्या आधीन सभा असावी. सभेच्या आधीन राजाने राहावे, राजा व सभा यांनी प्रजेच्या आधीन राहावे आणि प्रजेने राजसभेच्या आधीन राहावे.

*(पान १३३)*

### दक्षता

जे राजपुरुष म्हणजे न्यायाधीश अन्यायाने वादी व प्रतिवादी यांच्याकडून गुप्त रितीने लाच घेतात व पक्षपात करून अन्याय करतात, त्यांचे सर्वस्व हरण करून त्यांना यथायोग्य शिक्षा करावी. अशा लाचखाऊ सरकारी नोकरांना शिक्षा दिली गेली

नाही तर त्यांचे पाहून इतर राजपुरुषही तशीच दुष्कृत्ये करतील. परंतु त्यांना शिक्षा दिल्यास इतर लोक लाचलुचपतीपासून दूर राहतील. राजपुरुषांचा योगक्षेम उत्तम प्रकारे चालेल व ते बऱ्यापैकी धनाढ्यही बनू शकतील एवढे धन अथवा भूमी शासनातर्फे त्यांना दिली जावी. राजपुरुष वृद्ध झाल्यानंतर त्यांना त्यांचा निम्मा पगार जिवंत असेपर्यंत मिळावा. त्यांच्या निधनानंतर तो बंद व्हावा. मृत राजपुरुषांची मुले लहान असतील व पत्नी जिवंत असेल तर त्या सर्वांच्या पोटापाण्याची योग्य ती व्यवस्था शासनाकडून व्हावी. *(पान १५१-१५२)*

## करपद्धती

व्यापारी व कारागीर यांना सोने व चांदीच्या रूपाने जेवढा नफा मिळत असेल त्याचा पन्नासावा भाग कर म्हणून राजाने घ्यावा. तांदूळ वगैरे धान्याचा सहावा, आठवा किंवा बारावा भाग घ्यावा. शेतकऱ्यांकडून धान्यरूपाने कर न घेता तो पैशाच्या रूपात घ्यावयाचा असेल तर तो अशा प्रकारे घ्यावा की शेतकऱ्यांना खाण्याची ददात पडणार नाही अथवा ते निर्धन बनून दु:खी होणार नाहीत.

कारण प्रजा धनाढ्य, आरोग्यसंपन्न व खाऊनपिऊन सुखी असेल तरच राजाची भरभराट होते. राजाने प्रजेला आपल्या मुलाबाळांप्रमाणे सुखी ठेवावे व प्रजेने राजाला व राजपुरुषांना पित्याप्रमाणे मानावे. शेतकरी वगैरे श्रम करणारे लोक राजांचे राजे असतात आणि राजा त्यांचा रक्षणकर्ता असतो, ही वस्तुस्थिती आहे. प्रजाच नसेल तर राजा कुणाचा ? आणि राजा नसेल तर प्रजा कुणाची ? राजा आणि प्रजा हे दोघेही आपापल्या कामाच्या बाबतीत स्वतंत्र आणि परस्परांशी सहकार्य करण्याची गरज ज्या कामांमध्ये असते त्यांच्या बाबतीत ते एकमेकांवर अवलंबून असतात. प्रजेच्या सर्वसाधारण संमतीच्या विरुद्ध राजाने किंवा राजपुरुषांनी वागू नये. राजाच्या आज्ञेविरुद्ध प्रजेने किंवा राजपुरुषांनी वागू नये. *(पान १६२ - १६३)*

## करदात्यांचे रक्षण

लांब मार्गामध्ये ज्या प्रमाणात समुद्राच्या खाड्या, नद्या अथवा महानद्या येत असतील व देश जेवढा मोठा असेल त्या प्रमाणात नाकेबंदी करून कर बसवावा. महासमुद्रात अशी नाकी बसवता येणार नाहीत. परंतु त्याबाबतीत राजा आणि समुद्रावर

मोठमोठ्या नौका चालविणारे या दोघांना सोयीची होईल अशी व्यवस्था करावी. देशदेशांतरी व द्वीपद्वीपांतरी नौका घेऊन जाणाऱ्या आपल्या प्रजेचे सर्वप्रकारे उत्तम रक्षण होईल आणि त्यांना कोठेही कोणाकडूनही त्रास होणार नाही असा बंदोबस्त राजाने करावा. येथे हे लक्षात ठेवले पाहिजे की या देशात पूर्वी जहाजे नव्हती व आपले पूर्वज परदेशगमन करीत नव्हते असे जे लोक म्हणतात ते खोटे आहेत. परदेशात परद्वीपात नौकेने प्रवास करणाऱ्या आपल्या प्रजेचे पूर्ण रक्षण राजाने करावे. त्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ देऊ नये. *(पान १७४)*

### न्यायव्यवस्था

ज्या अपराधाबद्दल सामान्य माणसाला एक पैसा दंड होतो त्याच अपराधाबद्दल राजाला हजार पैसे दंड केला जावा. याचा अर्थ असा की सामान्य माणसाच्या हजारपट शिक्षा राजाला झाली पाहिजे. मंत्री किंवा दिवाण यांना आठशे पट, त्याहून खालच्या पातळीवरील व्यक्तींना सातशे पट, त्याहून खालच्या दर्जाच्या लोकांना सहाशे पट, या प्रमाणे ज्याची जी योग्यता असेल तिच्याप्रमाणे त्याला कमी किंवा जास्त शिक्षा करण्यात यावी. सर्वांत खालचा कर्मचारी म्हणजे पट्टेवाला होय. त्याला सामान्य माणसापेक्षा किमान आठपट शिक्षा झाली पाहिजे. याचे कारण असे की सामान्य प्रजाजनापेक्षा राजपुरुषाला म्हणजे सरकारी नोकराला जास्त शिक्षा झाली नाही तर हे राजपुरुष प्रजाजनांचा नाश करून टाकतील. सिंहाला ताब्यात ठेवायचे असेल तर त्याला कडक शिक्षा करावी लागते. परंतु शेळीला थोडीशी शिक्षा पुरते. तसेच हे आहे. म्हणून राजापासून तळागळाच्या नोकरापर्यंतच्या राजपुरुषांना त्यांच्या अपराधाबद्दल सामान्य जनतेपेक्षा जास्त शिक्षा करण्यात आली पाहिजे. *(पान १७१)*

### राजनीतीचे आधार

जे-जे नियम राजा व प्रजा यांच्यासाठी सुखकारक व धर्मयुक्त समजले जातील असे नियम पूर्ण विद्वानांच्या राजसभेने तयार करावेत. मात्र ही गोष्ट नेहमी लक्षात ठेवावी की शक्यतोवर बालपणी विवाह होता कामा नयेत. तरुणपणीही पतिपत्नींच्या संमतीशिवाय विवाह होऊ देऊ नयेत. ब्रह्मचर्याचे यथावत् पालन झाले पाहिजे. व्यभिचार

व बहुविवाह बंद झाले पाहिजेत. या योगे शरीर व आत्म्याचे सामर्थ्य वाढत राहते. जर कोणी केवळ  आत्म्याचे बळ म्हणजे विद्या व ज्ञान वृद्धिंगत करील आणि शारीरिक सामर्थ्याकडे दुर्लक्ष करील तर त्याचा काही उपयोग नाही. कारण एकटा बलवान मनुष्य शेकडो ज्ञानी व विद्वान् लोकांना जिंकू शकतो. या उलट जर फक्त शारीरिक बळच वाढविले आणि आत्म्याचे बळ वाढविले नाही तर विद्येच्या अभावी उत्तम राज्यकारभार चालू शकत नाही. राज्यव्यवस्था नीट नसेल तर सगळे जण आपापसात भांडून नष्ट होऊन जातील.  म्हणून नेहमी शरीराचे व आत्म्याचे बळ वाढवीत राहिले पाहिजे. व्यभिचार व अति विषयासक्ती यांच्यासारखी बळ व बुद्धीचा नाश करणारी दुसरी गोष्ट नाही.

विशेषत: क्षत्रियांनी सुदृढ व सबळ असले पाहिजे. कारण तेच विषयासक्त झाले तर राज्यधर्मच नष्ट होईल. हे लक्षात ठेवावे की 'यथा राजा तथा प्रजा' म्हणजे जसा राजा असेल तशीच त्याची प्रजा असते. म्हणून राजा व राजपुरुष यांनी कधीही दुराचार करू नये. त्यांनी सदैव धर्माने व न्यायाने वागून सर्वांना आदर्श घालून द्यावा.

*(पान १७५)*

# सातवा समुल्लास : ईश्वर

## निवडीची भूमिका

*स्वामी दयानंद मूर्तिपूजा मानत नव्हते. मूर्तिपूजेचे ते विरोधकच होते. परंतु ते परमेश्वराला मानत होते. समाजाच्या अभ्युदय आणि निःश्रेयसाचा विचार करताना शिक्षण, वर्णव्यवस्था, आश्रमव्यवस्था, शासनव्यवस्था या सर्वांबरोबर कोणाची उपासना करायची आणि उपासना कशी करायची याचाही विचार करायला हवा. भारतीय समाजात ३३ कोटी देवांची कल्पना आहे. देवांचा जो देव तो परमेश्वर किंवा परमात्मा हाच उपासनेस योग्य उपास्य देव आहे असे दयानंदांनी ठामपणे सांगितले आहे.*

*तेहतीस कोटी देवांची कल्पना पौराणिक आहे. पुराणे जर वेदांत सांगितलेले सांगत असतील तरच दयानंद त्यांना ग्राह्य मानतात, नाही तर त्याज्य मानतात. कोटी याचा रूढ अर्थ संख्यावाचक आहे. शंभर लक्ष म्हणजे एक कोटी हाच अर्थ सर्व लोक मानतात. कोटीचा दुसरा अर्थ आहे प्रकार. तेहतीस कोटी देव म्हणजे तेहतीस प्रकारचे देव वेदांत सांगितले आहेत. वेदांतले हे ३३ देव दयानंदांना मान्य आहेत. पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, चंद्र, सूर्य आणि नक्षत्र ही आठ सृष्टीची वसतीस्थाने असल्याने हे आठ वसू आहेत. पाच प्राण, पाच उपप्राण आणि अकरावा जीवात्मा हे शरीर सोडून जाताना रडवतात किंवा रुदन करायला लावतात म्हणून ते अकरा रुद्र आहेत. आणि वर्षाचे बारा महिने हे सर्वांचे आयुष्य क्रमाक्रमाने घेऊन जातात म्हणून ते बारा आदित्य आहेत. आठ वसू, अकरा रुद्र व बारा आदित्य हे ३१ देव झाले. ३२वा इंद्र म्हणजे वीज हे ऊर्जेचे एक रूप आणि ३३वा प्रजापती म्हणजे ज्यांच्यामुळे प्रजेचे पालन होते असे सगळ्या प्रकारचे यज्ञ. या तेहतीसांमध्ये विशेष गुण असल्यामुळे हे देव आहेत आणि ३४ वा या देवांचा देव महादेव असलेला परमेश्वर आहे.*

*मूर्तिपूजा का करायची नाही ? तर ज्या डोंगरातून मूर्ती घडवतो तो डोंगर व पृथ्वी याच परमेश्वराने बनवलेल्या महामूर्ती कायम समोर असतात. त्यांना पाहिल्यानंतर परमेश्वराचे स्मरण होत नसेल तर मूर्ती पाहिल्यानंतरही होणार नाही असे दयानंद म्हणतात. वेदप्रामाण्य व तर्कदृष्ट्या पाहिले तर दयानंदांचा हा युक्तिवाद योग्य व उत्तम आहे. इतिहासात 'सुंदर*

*ते ध्यान उभे विटेवरी' असे म्हणणारे भक्त 'मागे पुढे विठ्ठल भरला, रिता ठाव नाही उरला' अशा संतत्वाच्या अनुभवाच्या पायरीला पोहोचल्याचेही आपण पाहतो. व्यवहारात दिसणारी मूर्तिपूजा हा प्रारंभ आहे. अंतिमतः दयानंदांनी सांगितलेल्या निराकार परंतु सगुण व निर्गुण परमेश्वराच्या सत्य स्वरूपाकडेच जायचे आहे. असा समन्वय बुद्धिभेद व मनोभेद करायचा नाही म्हणून करावा लागतो. (महर्षी दयानंदांना व आर्य समाजाला मात्र असा समन्वय मान्य नाही . समन्वय करण्यासाठी दयानंदांनी आपल्या वेदोक्त तत्त्वांना मुरड घातली नाही. उलट मूर्तिपूजेच्या विरोधासाठी त्यांनी अत्यंत कष्ट सहन केले. समन्वयाची भूमिका जर आढळली, तर ती या पुस्तिकेच्या संकलकाची आहे.)*

*दयानंदांना मूर्तिपूजा मान्य नसली तरी सजीव देवांची पूजा करण्याचा पुरस्कार ते करतात. आई, वडिल, आचार्य, अतिथी आणि पती-पत्नींसाठी परस्पर या पाच देहधारी देवांच्या संगतीने मनुष्यदेहाची उत्पत्ती, पालन, सत्यशिक्षण, विद्या व सत्य-उपदेश हे मिळतात. या सजीव देवांची सेवा आणि सत्कार करणे हीच पूजा व उत्पत्तीपासून सत्योपदेश याच परमेश्वर प्राप्तीच्या पायऱ्या असे दयानंद म्हणतात.*

*दयानंद जसे मूर्तिपूजेच्या विरुद्ध आहेत तसेच मंदिरे, आश्रम, नद्या, तलाव इ. स्थळांना तीर्थ मानून अशा तीर्थांच्या तीर्थयात्रा करण्याच्याही विरोधात आहे. 'जे तारून नेते ते तीर्थ' अशी त्यांची तीर्थाची व्याख्या आहे. उत्तम गुण आणि उत्तम कर्म ही दुःखातून तारणारी असल्यामुळे शुभ गुण-कर्मे हीच तीर्थे असे दयानंद म्हणतात.*

*मूर्तिपूजा किंवा जलस्थलांच्या तीर्थयात्रा दयानंदांना मान्य नसल्या तरी परमेश्वराच्या साक्षात्कारासाठी स्तुती, प्रार्थना व उपासना हे तीन प्रकार मात्र त्यांना मान्य आहेत व त्यांचा पुरस्कार त्यांनी केला आहे. परमेश्वराच्या गुणांचे स्मरण करत, त्यांचे वर्णन करत, ते गुण आपल्यामध्ये आणणे ही परमेश्वराची स्तुती आहे. या स्तुतीमुळे ईश्वराविषयी प्रेम निर्माण होते. प्रयत्नांची पराकाष्ठा करून मग संकल्पपूर्तीसाठी परमेश्वराची प्रार्थना करणे यामुळे निरभिमानता म्हणजे नम्रता निर्माण होते. परमेश्वराबद्दल प्रेम वाढणे आणि स्वतःबद्दलचा अहंकार कमी होणे या दोन गोष्टी स्तुती व प्रार्थनेने झाल्यावर मग ईश्वराची उपासना करता येते. अष्टांग योगाने समाधी अनुभवणे हीच उपासना. स्तुती, प्रार्थना व उपासना या तीन्ही गोष्टी आयुष्यभर चालू ठेवाव्यात असे दयानंदांचे मत आहे.*

## सत्यार्थप्रकाशातील वेचे

### परमेश्वर कोणता ?

जो सर्व दिव्य गुणकर्मस्वभाव व विद्या यांनी युक्त आहे, ज्याच्यामध्ये पृथ्वी, सूर्य आदी लोक स्थित आहेत, जो आकाशाप्रमाणे सर्वत्र व्याप्त आहे व जो सर्व देवांचा देव आहे त्या परमेश्वराला जे लोक जाणत नाहीत, मानत नाहीत व त्याचे ध्यानही करत नाहीत ते नास्तिक व निर्बुद्ध लोक सदैव दु:खसागरात बुडालेले राहतात. मात्र जे लोक त्याचीच जाणीव बाळगतात ते सर्व सुखी होतात. *(पान १७६)*

### देव कोणते ?

जे लोक देव किंवा देवता या शब्दाचा अर्थ परमेश्वर असा करतात त्यांची ती चूक आहे. परमेश्वर हा देवांचा देव असल्याने त्याला महादेव म्हणतात. तोच साऱ्या जगाची उत्पत्ती, स्थिती व लय करणारा, न्यायाधीश व अधिष्ठाता म्हणजे सर्वांचा आधार आहे.

शतपथ ब्राह्मणात अशी व्याख्या करण्यात आली आहे की तेहतीस देव आहेत. पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश, चंद्रमा, सूर्य व नक्षत्रे ही आठ सर्व सृष्टीची निवासस्थाने असल्याने ते आठ वसू आहेत.

प्राण, अपान, व्यान, उदान व समान हे पाच प्राण. नाग, कूर्म, कृकल, देवदत्त व धनंजय हे पाच उपप्राण★ आणि अकरावा जीवात्मा हे शरीराला सोडून जाताना रुदन करायला लावतात म्हणून या अकरांना रुद्र असे म्हणतात.

संवत्सराच्या बारा महिन्यांना बारा आदित्य म्हणतात. कारण ते सर्वांचे आयुष्य घेऊन जाणारे असतात.

ऊर्जेचे एक रूप असलेल्या विजेचे एक नाव इंद्र आहे. कारण ऊर्जा ऐश्वर्यदायक असते. यज्ञ म्हणजेच प्रजापती. कारण हवनाच्या योगाने वायू, वृष्टी, जल व औषधी वनस्पती यांची शुद्धी होते व प्रजेचे पालन होते. विद्वानांचा सत्कार व नाना प्रकारची शिल्पविद्या (कारागिरी) यांचाही समावेश यज्ञामध्ये होतो. यज्ञामुळे प्रजेचे पालन होते.

---

★ *उपप्राणांचे काम अवयवांच्या रक्षणाचे असते. त्यांमुळे होणाऱ्या क्रिया पुढीलप्रमाणे आहेत : नाग - ढेकर देणे, कूर्म - पापण्यांची उघड झाप, कृकल - शिंकणे, देवदत्त - जांभई देणे, धनंजय - मृत्यूनंतर काही काळ शरीराचे कुजणे थांबवणे*

आठ वसू, अकरा रुद्र, बारा आदित्य, इंद्र व प्रजापती या तेहतीसांमध्ये त्या त्या ठिकाणी वर्णन केलेले गुण असल्यामुळे त्यांना देव असे म्हणतात.

त्यांचा स्वामी व सर्वांहून श्रेष्ठ असा जो चौतीसावा परमात्मा तोच उपास्यदेव आहे. *(पान १७६ - १७७)*

## मूर्तिपूजा का नको ?

ज्याअर्थी परमेश्वर निराकार, सर्वव्यापक आहे त्याअर्थी त्याची मूर्ती बनूच शकत नाही. आणि जर केवळ मूर्तीच्या दर्शनाने परमेश्वराचे स्मरण होत असेल तर परमेश्वराने निर्माण केलेली पृथ्वी, पाणी, अग्नी, वायू, वनस्पती वगैरे वस्तूंच्या अद्‌भुत रचना पाहून ईश्वराचे स्मरण होणार नाही काय ? ज्या डोंगरातून माणूस मूर्ती घडवितो ते डोंगर व पृथ्वी याच परमेश्वराने बनवलेल्या महामूर्ती आहेत त्या पाहून परमेश्वराचे स्मरण होऊ शकणार नाही काय ? शिवाय मूर्ती पाहिल्यानंतर परमेश्वराचे स्मरण होते असे जे तुम्ही म्हणता ते पूर्णपणे खोटे आहे. कारण जेव्हा मूर्ती समोर नसेल तेव्हा परमेश्वराचे स्मरण न झाल्याने माणूस एकान्त मिळताच चोरी, जारी वगैरे दुष्कृत्ये करण्यास प्रवृत्त होईल. समोर मूर्ती नसल्यामुळे आपल्याला कोणी पाहात नाही असे त्याला वाटेल आणि तो वाटेल ते कुकर्म करेल. परंतु परमेश्वर नेहमीच सर्व काही ह्लह्ल सत्कर्मे व कुकर्मे ह्लह्ल पाहात असतो.

जो कोणी पाषाणादिकांच्या मूर्तीवर श्रद्धा न ठेवता सर्वदा सर्वव्यापक, सर्वान्तर्यामी, न्यायकारी परमात्मा सर्वत्र आहे असे जाणतो व मानतो तो हे ओळखतो की, परमेश्वर सगळ्यांची बरी-वाईट कृत्ये सदैव पाहात असतो; आणि एक क्षणही आपण परमात्म्यापासून दूर राहू शकत नाही. म्हणून कुकर्म करण्याची गोष्ट दूरच राहिली, तसे काही करण्याचा वाईट विचारही तो मनात आणू शकत नाही.

*(अकरावा समुल्लास पान ३१४)*

## सजीव देवांची पूजा हवी

कोणत्याही प्रकारची मूर्तिपूजा करू नये. परंतु पाच सजीव देवांची पूजा करणे, त्यांचा सत्कार करणे हे आपले कर्तव्य आहे. पंचदेवपूजा किंवा पंचायतन पूजा शब्दांचा अर्थ फार चांगला आहे.

पहिली मूर्तिमती, पूजनीय देवता माता आहे. सर्व मुला-मुलींनी तन-मन-धनाने

मातेची सेवा करून तिला प्रसन्न ठेवावे. तिच्याशी कधीही कठोर वर्तन करू नये व अपशब्द वापरून तिला दु:ख देऊ नये.

दुसरा देव पिता आहे. त्याचीही सेवा करावी आणि त्याचा सत्कार करावा.

तिसरा देव गुरू किंवा आचार्य हा आहे. तो आपल्याला विद्या देतो. तन-मन-धनाने त्यांची सेवा करावी.

चौथा देव अतिथी आहे. जो विद्वान, धार्मिक, निष्कपटी, सर्वांचे कल्याण इच्छिणारा, जगभर भ्रमण करणारा, सत्याच्या उपदेशाने सर्वांना सुखी करणारा अतिथी असतो, त्याची सेवा करावी.

पाचवा देव पत्नीसाठी पती व पतीसाठी पत्नी हा होय. स्त्रीला तिचा पती देवाप्रमाणे व पुरुषाला त्याची पत्नी देवतेप्रमाणे पूजनीय असते.

हेच ते वैदिक पंचायतन होय. याच देहधारी देवांच्या संगाने मनुष्यदेहाची उत्पत्ती, पालन, सत्यशिक्षण, विद्या व  सत्योपदेश यांची प्राप्ती होते. याच परमेश्वर प्राप्तीच्या पायऱ्या आहेत. या देवतांची पूजा न करता जे लोक पाषाणादिकांच्या मूर्तींची पूजा करतात ते अत्यंत वेदविरोधी आहेत. *(अकरावा समुल्लास ३२३ - ३२४)*

### शुभ गुण-कर्मे हीच तीर्थे

सत्य शास्त्रांचे अध्ययन-अध्यापन, धर्मनिष्ठ विद्वानांचा सत्संग, परोपकार, धर्मानुष्ठान, योगाभ्यास, निर्वैरत्व, निष्कपटत्व, सत्यभाषण, सत्य मानणे, सत्य करणे, ब्रह्मचर्य; आचार्य, अतिथी, माता व पिता यांची सेवा; परमेश्वराची स्तुती, प्रार्थना व उपासना; शांती, जितेंद्रियता, सुशीलता, धर्मयुक्त पुरुषार्थ, ज्ञान-विज्ञान,इत्यादी शुभ गुणकर्म दु:खातून तारणारे असल्यामुळे ती वेदांनुसार तीर्थेच आहेत. जल व स्थल यांनी युक्त असणारी ठिकाणे ही कधी तीर्थे असू शकत नाहीत. कारण 'जना: यै: तरन्ति तानि तीर्थानि' म्हणजे ज्यांच्या योगाने माणूस दु:खातून मुक्त होतो त्यांना तीर्थ असे म्हणतात. जल-स्थलयुक्त ठिकाणे ही तारणारी नसून बुडवून मारणारी असतात. त्यापेक्षा नौका वगैरेंना तीर्थ म्हणणे अधिक सयुक्तिक होय. कारण त्यांच्या साहाय्याने माणसे समुद्र वगैरे तरून जातात. *(अकरावा समुल्लास ३३५ - ३३६)*

## परमेश्वराचा साक्षात्कार

प्रश्न : परमेश्वराची स्तुती, प्रार्थना व उपासना केली पाहिजे की नाही ?

उत्तर : केली पाहिजे.

प्रश्न : स्तुती वगैरे केल्याने ईश्वर आपला नियम सोडून स्तुती, प्रार्थना करणाऱ्याला पापमुक्त करील काय ?

उत्तर : नाही.

प्रश्न : तर मग स्तुती, प्रार्थना कशासाठी करायची ?

उत्तर : स्तुती, प्रार्थनेचे फळ वेगळेच आहे.

प्रश्न : ते कोणते ?

उत्तर : स्तुतीमुळे ईश्वराविषयी प्रीती निर्माण होते. त्याच्या गुण-कर्म-स्वभावाच्या चिंतनाने आपल्या गुण-कर्म-स्वभावात सुधारणा होऊ शकते. प्रार्थनेने निरभिमानता निर्माण होऊन उत्साह वाढतो व साहाय्य मिळते. उपासनेने परब्रह्माशी मेळ होऊन त्याचा साक्षात्कार घडतो. *(पान १८१)*

## ईश्वराची स्तुती

तो परमात्मा सर्वत्र व्यापक, शीघ्रकारी व बलवान आहे. तो शुद्ध, सर्वज्ञ, सर्वांचा अंतर्यामी, सर्वांवर विराजमान, सनातन, स्वयंसिद्ध आहे. परमेश्वर अनादी काळापासून आपल्या अनादी सनातन जीवरूपी प्रजेला आपल्या सनातन विद्येने यथावत् अर्थांचा बोध वेदाद्वारे करीत आहे. ही सगुण स्तुती झाली. परमेश्वरामध्ये जे-जे गुण आहेत त्या गुणांचे वर्णन म्हणजे सगुण स्तुती होय.

तो परमेश्वर कधी शरीर धारण करत नाही, अथवा जन्म घेत नाही. त्याच्यामध्ये छिद्र अथवा व्रण असत नाही, तो नाडीशिरास्नायूच्या बंधनात अडकत नाही, तो कधी पापाचरण करत नाही, त्याला क्लेश, दु:ख, अज्ञान कधीही होत नाहीत, रागद्वेषादी विकारांपासून तो अलिप्त असतो, अशा प्रकारे परमेश्वराची जी स्तुती केली जाते ती निर्गुण स्तुती होय.

परमेश्वरामध्ये जे गुण आहेत तसे गुण-कर्म-स्वभाव आपलेही बनणे हे स्तुतीचे फळ आहे. उदाहरणार्थ परमेश्वर न्यायी आहे. तसेच आपणही न्यायी बनण्याचा प्रयत्न करावा. असे न करता केवळ भाटाप्रमाणे जो परमेश्वराचे गोडवे गातो पण आपले आचरण सुधारत नाही त्याचे ते गुणसंकीर्तन व्यर्थ आहे. *(पान १८२)*

## ईश्वराची प्रार्थना

जी व्यक्ती ज्या गोष्टीसाठी प्रार्थना करत असेल तिने त्याप्रमाणे आपले आचरण ठेवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती सर्वोत्तम बुद्धी मिळावी म्हणून परमेश्वराची प्रार्थना करीत असेल तर तिने आपणाकडून होईल तितका विद्याव्यासंग केला पाहिजे. म्हणजे असे की, आपल्या पुरुषार्थाची पराकाष्ठा केल्यानंतरच परमेश्वराची प्रार्थना करणे उचित होईल.

अशी प्रार्थना कधीही करता कामा नये की, ''हे परमेश्वरा ! तू माझ्या शत्रूंचा नाश कर. मला सर्वांत मोठा बनव. माझीच प्रतिष्ठा वाढव आणि माझ्या आधीन सर्व राहतील असे कर.'' अशी प्रार्थना परमेश्वर कधीही स्वीकारत नाही. कारण जेव्हा दोन शत्रू एकमेकांच्या नाशासाठी ईश्वराची प्रार्थना करत असतील तेव्हा परमेश्वराने दोघांची प्रार्थना मान्य करून दोघांचा नाश करावा काय ? कोणी असे म्हणेल की ज्याची भक्ती अधिक असेल त्याची प्रार्थना ईश्वराने ऐकावी. यावर आमचे म्हणणे असे की ज्याची भक्ती कमी असेल त्याच्या शत्रूचाही कमी नाश व्हावा. अशा मूर्खपणाच्या प्रार्थना करता करता एखादा माणूस अशीही प्रार्थना करेल की, ''हे परमेश्वरा ! तू आम्हाला भाकरी भाजून घाल. माझे घर झाडून काढ. माझे कपडे धू आणि माझी शेतीवाडीही कसून दे.'' अशा प्रकारे जे लोक देवावर हवाला ठेवून आळसाने बसून राहतात ते महामूर्ख असतात. कारण माणसाने पुरुषार्थ करावा हीच तर परमेश्वराची आज्ञा आहे. ती आज्ञा जो मोडील त्याला कधीच सुख मिळणार नाही. *(पान १८४ - १८५)*

## ईश्वराची उपासना

समाधीच्या योगाने ज्या पुरुषाचे अविद्यादी मळ नष्ट झाले आहेत, ज्याने आत्मस्थ होऊन परमात्म्यामध्ये आपले चित्त केंद्रित केले आहे त्याला परमात्म्याशी मीलनाचे जे सुख प्राप्त होते त्याचे वर्णन वाणीने करता येत नाही. कारण जीवात्मा आपल्या अंत:करणाने त्या आनंदाचे ग्रहण करतो. उपासना या शब्दाचा अर्थ जवळ बसणे असा आहे. अष्टांग योगाद्वारे परमात्म्याचे सान्निध्य प्राप्त करणे आणि त्याला सर्वव्यापी, सर्वान्तर्यामी या रूपात प्रत्यक्ष पाहणे, यासाठी जे करावे लागते त्याला उपासना असे म्हणतात. *(पान १८५)*

# आठवा समुल्लास : सृष्टीची उत्पत्ती

## निवडीची भूमिका

*सृष्टी कोणी निर्माण केली की सृष्टी अनादी आहे, हा तत्त्वज्ञानातील मोठा प्रश्न आहे. तसेच या सृष्टीचा प्रलय होणार आहे की सृष्टी अनंत आहे हाही एक अनुत्तरित प्रश्न आहे. आपण सृष्टीचाच भाग असल्यामुळे बुद्धीच्या आधाराने सृष्टीच्या आदी-अंताबद्दल बोलणे अशक्य आहे. दिवस आणि रात्र एकापाठोपाठ एक येत असतात परंतु पहिला दिवस कोणता व शेवटची रात्र कोणती हे सांगणे अशक्य आहे. त्याचप्रमाणे सृष्टी आणि प्रलय हे एका पाठोपाठ एक होत राहतात. परंतु पहिल्यांदा सृष्टी कधी झाली व शेवटचा प्रलय कधी होणार आहे हे सांगणे अशक्य आहे, असे स्वामी दयानंद वेदांच्या आधाराने श्रद्धापूर्वक सांगतात.*

*सृष्टीचा प्रारंभ कधी झाला ? पृथ्वीवर मनुष्य प्रथम कुठे आणि कधी निर्माण झाला ? भारतामध्ये आर्य कधीपासून राहू लागले ? या सगळ्यांचीच उत्तरे देणे अवघड आहे. परंतु पुन्हा वेदांच्या आधारे इक्ष्वाकु या राजाने भारताला आर्यावर्त बनवले. म्हणजे भारतात संस्कृती प्रस्थापित केली. आर्यावर्ताची सद्यःस्थिती आर्यांमधील आळस व परस्पर द्वेष या दोषांमुळे तयार झाली आहे, असे दयानंदांचे म्हणणे आहे. परकीय सत्ता जाऊन स्वराज्य यायचे असेल तर राष्ट्रीय एकात्मता निर्माण झाली पाहिजे आणि त्यासाठी वेदादी शास्त्रांमध्ये सांगितलेले विधिनिषेध स्वीकारून त्याप्रमाणे वागायला सुरुवात केली पाहिजे असे दयानंदांचे म्हणणे आहे.*

*या आठव्या समुल्लासातील वेच्यांमध्ये आणि पुढे दहाव्या समुल्लासातील वेच्यांमध्येही आर्य, आर्यावर्त, आर्य संस्कृती असे शब्द आले आहेत. भारतात राहणाऱ्या लोकांपैकीच जे चारित्र्यवान, नीतिमान, सुसंस्कारित आहेत ते आर्य अशी वैदिक काळातील व्याख्या आहे. भारतातील ज्या लोकांना त्यांच्या भौगोलिक, आर्थिक व सामाजिक परिस्थितीमुळे अजून चारित्र्यवान, नीतिमान, सुसंस्कारित जीवन जगता येत नाही त्यांना आर्य बनवायचे आहे. तसेच साऱ्या जगातील लोकांनाही आर्य*

बनवायचे आहे अशीच वैदिक काळातील समाजधुरीणांची आकांक्षा होती. 'कृण्वन्तो विश्वम् आर्यम्' यासारख्या घोषणांमधून हीच आकांक्षा व्यक्त होते. निग्रो, मंगोलिअन, कॉकेशिअन हे जसे विविध मानववंश आहेत तसा आर्य म्हणून कुठला मानव-वंश आहे अशी प्राचीन भारतीयांची तरी समजूत नव्हती. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये, विशेषतः जर्मनीमध्ये, नाझी पक्षाने ज्यू धर्मीय वगळता इतर सर्व जर्मन लोक आर्य वंशाचे आहेत असा प्रभावी अपप्रचार केला होता. वैदिक काळापासून दयानंदांपर्यन्त आर्य हा कायमच सद्गुणवाचक शब्द होता, वंशवाचक नाही. त्यामुळेच, सर्व जातींच्या स्त्री-पुरुषांना वेदपठणाचा अधिकार असल्याचे महत्त्वाचे प्रतिपादन स्वामी दयानंदांनी केले व ते आर्य समाजाचे वैशिष्ट्य ठरले. नाझी जर्मनीच्या अस्तानंतर आर्य शब्दाचा वंशवाचक गैरवापर कमी होत गेला आहे. जिथे आर्य म्हणजे सुसंस्कृत लोक राहतात तो आर्यावर्त. विकसित संस्कृती ती आर्य संस्कृती. आजच्या भाषेत बोलायचे झाले तर आर्यावर्त म्हणजे अखंड भारत. आर्य संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृती. आर्य म्हणजे समाजाभिमुख, कृतिशील, राष्ट्रीय वृत्तीचा आदर्श भारतीय नागरिक. या आदर्शापर्यंत जाण्याचा प्रयत्न सर्वांनीच केला पाहिजे. स्वामी दयानंद जिला आर्य संस्कृती म्हणतात, तिलाच स्वामी विवेकानंद हिंदू संस्कृती म्हणतात, तिलाच योगी अरविंद *Foundations of Indian Culture* या निबंधसंग्रहात *Indian Culture* म्हणतात आणि तिलाच साने गुरुजी भारतीय संस्कृती म्हणतात. भौगोलिक व ऐतिहासिक संदर्भ बाजूला केल्यावर या भारतीय संस्कृतीची पायाभूत तत्त्वेच मानवी विश्वसंस्कृतीची पायाभूत तत्त्वे बनू शकतात.

आळस, प्रमाद व आपसातील यादवी यांच्यामुळे आर्यावर्तातच आर्यांचे स्वतंत्र राज्य राहिले नाही असे स्वामी दयानंद म्हणतात. तेव्हा त्याचा अर्थ आर्य बनणे हा आदर्श मानणारे लोक आज त्या आदर्शाप्रमाणे जगत नाहीत असाच घेतला पाहिजे. वैदिक काळात आर्यत्वाचा आदर्श मानणाऱ्यांची संख्या जास्त होती. सर्वजण त्या आदर्शाप्रमाणे तेव्हाही जगू शकत होते असे नाही. आज आर्यत्वाचा आदर्श मानणाऱ्यांची संख्या कमी असेल. परस्पर-सहकार्यानेआर्यत्वाच्या आदर्शाप्रमाणे जगू इच्छिणाऱ्यांसाठीच महर्षी दयानंदांनी आर्य समाजाची स्थापना केली.

# सत्यार्थप्रकाशातील वेचे

## सृष्टीचा प्रारंभ

ज्याप्रमाणे दिवसापूर्वी रात्र आणि रात्रीपूर्वी दिवस, तसेच दिवसानंतर रात्र व रात्रीनंतर दिवस हे चक्र चालू असते, त्याचप्रमाणे सृष्टीपूर्वी प्रलय व प्रलयापूर्वी सृष्टी, तसेच सृष्टीनंतर प्रलय व प्रलयानंतर सृष्टी हे चक्र अनादी काळापासून चालत आले आहे. त्याला आदी किंवा अंत नाही. परंतु जसा दिवसाचा किंवा रात्रीचा आरंभ व अंत पाहायला मिळतो तसाच सृष्टी आणि प्रलय यांचा आदी व अंत होत असतो. कारण जसे परमेश्वर, जीव, जगाचे कारण हे तीन पदार्थ स्वरूपत: अनादी आहेत, तसेच जगाची उत्पत्ती, स्थिती व लय हेही प्रवाहरूपाने अनादी आहेत. नदीचा प्रवाह डोळ्यांना दिसतो, कधी तो सुकून जातो, कधी दिसतच नाही. तो पावसाळ्यात पुन्हा दिसू लागतो व उन्हाळ्यात दिसेनासा होतो. अशा या व्यवहाराला प्रवाहरूप समजावे. जसे परमेश्वराचे गुण, कर्म, स्वभाव अनादी आहेत. तसेच त्याच्याद्वारे जगाची उत्पत्ती, स्थिती व लय घडून येणे हेही अनादी आहे. ज्याप्रमाणे ईश्वराचे गुण, कर्म व स्वभाव यांना आरंभ व अंत नसतो त्याचप्रमाणे त्याच्या कर्तव्यकर्माचाही प्रारंभ व अंत नसतो. *(पान २२५)*

## आर्यावर्ताची सद्यःस्थिती

आता दुर्दैवाने आर्यांमधील आळस, प्रमाद व आपसातील यादवी या दोषांमुळे इतर देशांवर राज्य करण्याची गोष्ट तर दूरच राहिली; पण खुद्द आर्यावर्तातही आर्यांचे अखंड, स्वतंत्र, स्वाधीन, निर्भय राज्य राहिले नाही. जे काही उरले आहे ते विदेशी लोकांकडून पादाक्रांत केले जात आहे. काही थोडे राजे स्वतंत्र आहेत. जेव्हा वाईट दिवस येतात तेव्हा देशवासियांना अनेक प्रकारची दु:खे भोगावी लागतात. कोणी काहीही म्हटले तरी स्वदेशी राज्य असणे ही गोष्ट सर्वश्रेष्ठ व उत्तम असते.

धार्मिक पूर्वग्रहापासून अलिप्त, आपले व परके यांच्या बाबतीत पक्षपात न करणारे, प्रजेवर मातापित्यांप्रमाणे कृपा, न्याय व दया करणारे; अशा परकीय लोकांचे राज्यही पूर्णपणे सुखदायक नाही. परंतु वेगवेगळ्या भाषा, भिन्न प्रकारचे शिक्षण आणि भिन्न व्यवहार यांच्यामुळे होणारा विरोध नाहीसा होणे अत्यंत कठिण आहे. तो नाहीसा

झाल्याखेरीज लोकांना एकमेकांचे हित साधणे व आपले उद्दिष्ट साध्य करणे सहजासहजी शक्य होणार नाही. म्हणून वेदादी शास्त्रांनी जे सांगितले आहे त्यावरून विधिनिषेधाची जी व्यवस्था इतिहासात प्रतिपादलेली आहे ती मान्य करणे हे सज्जनांच्या दृष्टीने उचित होय. *(पान २२८)*

# नववा समुल्लास : बंध व मोक्ष विवेचन

## निवडीची भूमिका

*वेदांचे दोन भाग आहेत. एक ज्ञानकाण्ड व दुसरे क्रियाकाण्ड. दयानंदांच्या मते क्रिया दोन प्रकारच्या असतात. कर्म म्हणजे शारीरिक किंवा बाह्य क्रिया व उपासना म्हणजे मानसिक किंवा आंतरिक क्रिया. त्यामुळे वेदांतील कर्मकाण्ड व उपासनाकाण्ड हे क्रियाकाण्डामध्येच येतात. ज्ञानकाण्डाला जर 'विद्या' असे नाव दिले तर क्रियाकाण्डाला 'अविद्या' म्हणता येईल. विद्येने कोणत्याही वस्तूचे तत्त्वतः ज्ञान होते. तर अविद्या म्हणजे त्या वस्तूचे केवळ भ्रामक म्हणजे व्यावहारिक ज्ञान होणे.*

*मनुष्य शारीरिक किंवा मानसिक क्रियेखेरीज क्षणभरही राहू शकत नाही. या क्रिया चांगल्या प्रकारे करायला शिकणे म्हणजे अविद्या जाणणे. केवळ कर्म व उपासनेद्वारा म्हणजे अविद्या जाणून माणूस मृत्यूवर विजय प्राप्त करू शकणार नाही. त्याचप्रमाणे जो केवळ विद्या जाणतो तो अमृतत्वाची प्राप्ती करू शकणार नाही. विद्या व अविद्या दोन्ही एकाच वेळी जाणल्याने मृत्यु व दुःख यातून पार होता येते व अमतृतत्वाची प्राप्ती होते. दुःखापासून सुटका व अमृतत्वाची प्राप्ती म्हणजेच मोक्ष. या उलट अधर्म व अज्ञान यात गुरफटून जाणे म्हणजे बंधन. मनुष्याने बंधनातून सुटण्याचा म्हणजेच मोक्ष किंवा मुक्ती मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.*

## सत्यार्थप्रकाशातील वेचे

### कर्म, उपासना व ज्ञान हे मुक्तीचे साधन

जिच्या योगाने पदार्थांच्या यथार्थ स्वरूपाचा बोध होतो तिला विद्यज्ञ असे म्हणतात, आणि जिच्या योगाने तत्त्वस्वरूपाचे ज्ञान होत नाही, भ्रमाने एकात दुसऱ्याची कल्पना होते, तिला अविद्या असे म्हणतात. कर्म व उपासना यांनाही अविद्या असे म्हणतात. याचे कारण असे की हे दोन्ही प्रकार बाह्य व आंतरिक क्रियाविशेषाचे आहेत, ज्ञानविशेषाचे नाहीत. म्हणूनच शुद्ध कर्म व परमेश्वराची उपासना यांच्या मदतीखेरीज कोणीही मृत्यू व दु:ख यातून पार होऊ शकत नाही. अर्थात पवित्र कर्म, पवित्र उपासना आणि पवित्र ज्ञान यांच्या योगानेच मुक्ती मिळते. आणि अपवित्र कर्म, मिथ्या भाषण आदी गोष्टी, पाषाणमूर्ती आदींची उपासना आणि मिथ्या ज्ञान यांच्यामुळे बंध होतो म्हणजे माणूस बंधनात पडतो. *(पान २३५)*

### सदाचरणाने मुक्ती

परमेश्वराच्या आज्ञेचे पालन करणे, अधर्म, अविद्या, कुसंग, कुसंस्कार, वाईट व्यसने यांच्यापासून दूर राहणे; सत्य भाषण, परोपकार, विद्या, पक्षपातरहित न्याय व धर्म यांची वृद्धी करणे; परमेश्वराची स्तुती, प्रार्थना व उपासना करणे; योगाभ्यास करणे, विद्या शिकणे व शिकवणे; धर्माने पुरुषार्थ करून ज्ञानाची उन्नती करणे; सर्वात उत्तम साधनांचा वापर करणे; आणि जे काही करावयाचे ते सर्व पक्षपातरहित न्यायधर्मानुसार करणे इत्यादी साधनांनी मुक्ती मिळते आणि याहून विपरीत ईश्वराची आज्ञा भंग करणे वगैरे कामांच्या योगाने बंध होतो. *(पान २३९)*

### दुःखापासून सुटका मिळवणे हा पुरुषार्थ

शारीरिक दुःखे, इतर प्राण्यांपासून उत्पन्न होणारी दुःखे व अतिवृष्टी, अत्यंत उन्हाळा, अत्यंत थंडी, अनावृष्टी, मन व इंद्रिये यांची चंचलता यांतून निर्माण होणारी दुःखे, या त्रिविध दुःखांपासून सुटका करून घेऊन मुक्ती मिळविणे हा अत्यंत पुरुषार्थ आहे.

*(पान २६०)*

# दहावा समुल्लास : आचार व अनाचार विवेचन

## निवडीची भूमिका

*वेदादि शास्त्रांच्या साहाय्याने स्वराज्य असतानाचा आचार-विचार तर कळतो. परकीयांची सत्ता असताना काय केले पाहिजे हे कळायला हवे, यासाठी मात्र स्वामी दयानंदांची प्रज्ञा लागते. स्वराज्यात फक्त स्वतःच्या मुक्तीचा विचार करून चालते परंतु परकीयांचे राज्य असताना देशाच्याही मुक्तीचा विचार करायला पाहिजे अशी दयानंदांची स्पष्ट भूमिका आहे.*

*स्वराज्य असताना आपण इतर देशांची माहिती करून घेतली नाही. परदेशप्रवास केला नाही. म्हणून आपल्या देशाच्या नशिबी दारिद्र्य व पारतंत्र्य आले. आपण सत्कृत्य करत असलो तर परदेशप्रवास केल्याने कोणतेही पाप लागत नाही असे दयानंदांनी स्पष्ट सांगितले आहे. उलट देशोदेशी जाऊन व्यापार केल्याखेरीज देशाची उन्नती होणार नाही असे दयानंद सांगतात.*

*पूर्वी आपला देश संपन्न होता, सामर्थ्यशाली होता तेव्हा संपन्नतेतही सत्कर्म करत राहण्याची दक्षता आपण घेतली नाही. उलट आळस, शिथिलता, स्पर्धा, चैन असे दुर्गुण वाढू लागले. त्यामुळे कमी संख्येच्या परकीयांनीही आपला पराभव केला. सत्कर्म करत समृद्धीसाठी प्रयत्न करणे आणि समृद्धीतही सत्कर्म करत राहणे याचीच राष्ट्रघडणीसाठी गरज असते. शांततेच्या काळातील विधिनिषेध आणि युद्धजन्य परिस्थितीतील विधिनिषेध यांच्यात विवेक करायला पाहिजे, हे आमच्या मूर्खपणामुळे आम्ही विसरलो आणि ते भारताच्या पारंतत्र्याचे कारण आहे असे विधानही दयानंद करतात. राष्ट्रीय एकात्मता होण्यासाठी सर्व जातींनी एकत्र खाणे-पिणे करायला तयार असले पाहिजे. परंतु तेवढी तयारी नसते. परस्परांचे यशापयश, गौरव आणि अपमान एकच आहेत असे सर्व भारतीय मानायला लागले तरच देशाची प्रगती, उन्नती होईल.*

*देशातील व्यक्तींनी तर परस्पर सहकार्य केले पाहिजेच परंतु देशातील सर्व संघटना व समाजांनी परस्पर सहकार्याने काम केले पाहिजे, असे दयानंद म्हणतात. आर्य समाजाला सहकार्य करावे अशा त्यांच्या आवाहनाने या संकलनाचा समारोप करू या.*

## सत्यार्थप्रकाशातील वेचे

### देशाच्या समृद्धीसाठी विदेशप्रवास

सर्व सज्जनांनी हे ओळखले पाहिजे की मोह, द्वेष, अन्याय, मिथ्या भाषण इत्यादी दोषांचा त्याग करून निर्वैरता, प्रीती, परोपकार, सज्जनता इत्यादी गुणांचे ग्रहण करणे हाच उत्तम आचार आहे. तसेच हेही ओळखावे की धर्म हा आपल्या आत्म्यात आणि कर्तव्यात निहित असतो. जेव्हा आपण सत्कृत्ये करीत असतो तेव्हा आपल्याला परदेशगमन केल्याने कोणताही दोष किंवा पाप लागत नाही. दुष्कृत्ये केल्यानेच दोष किंवा पाप लागते.

अर्थात परदेशी जाणाऱ्याने वेदोक्त धर्माची संपूर्ण माहिती घेतली पाहिजे आणि पाखंड मताचे खंडन कसे करावयाचे तेही शिकून घेतले पाहिजे. तसे झाल्यास आपल्याला कोणीही खोटे ठरवू शकणार नाही. देशदेशान्तरी व द्वीपद्वीपान्तरी जाऊन तेथे राज्य व व्यापार केल्याखेरीज आपल्या देशाची उन्नती होणे कधी तरी शक्य आहे काय ? जेव्हा येथील लोक आपल्याच देशात व्यापार करतात आणि परदेशी लोक येथे येऊन व्यापार व राज्य करतात तेव्हा दारिद्र्य व दु:ख या खेरीज स्थानिक लोकांच्या नशिबी दुसरे काय असणार ? *(पान २६८)*

### संपन्नतेचे अनिष्ट परिणाम

परमेश्वराच्या या सृष्टीमध्ये अहंकारी, अन्यायी, अविद्वान लोकांचे राज्य फार काळ टिकत नसते. जगाची ही स्वाभाविक प्रवृत्ती आहे की, जेव्हा एखाद्या लोकसमूहात किंवा देशात गरजेपेक्षा जास्त धन जमा होते तेव्हा आळस, पुरुषार्थहीनता, ईर्ष्या, द्वेष, विषयासक्ती आणि प्रमाद वाढू लागतात. त्यामुळे देशात विद्या आणि सुशिक्षण नष्ट होऊन मद्यमांससेवन, बाल्यावस्थेत विवाह, स्वैराचार वगैरे सारखे दुर्गुण व व्यसने वाढतात. तसेच जेव्हा युद्धविभाग, युद्धविद्याकौशल्य आणि सैन्य इतके प्रचंड वाढते की, त्याच्यासमोर जगातला कोणताही देश टिकाव धरू शकत नाही, तेव्हा त्या सामर्थ्यशाली देशाच्या लोकांमध्ये पक्षपात, अहंकार यामुळे अन्याय, अत्याचार या गोष्टी वाढतात. हे दोष प्रमाणाबाहेर वाढले की, त्यांच्यात यादवी सुरू होऊन त्यांचा नाश होतो किंवा त्यांच्या बाहेरच्या एखाद्या लहानशा गटातून एक अत्यंत समर्थ पुरुष

उदयाला येतो आणि त्यांचा पराभव करतो. उदाहरणार्थ, मुसलमान बादशहांच्या सत्तेविरुद्ध शिवाजी व गुरु गोविंदसिंह दंड ठोकून उभे राहिले आणि त्यांनी मुसलमानी सत्ता धुळीला मिळवली. *(अकरावा समुल्लास, पान २८०)*

## मूर्ख कल्पनांमुळे सर्वनाश

एक मर्यादा आपण अवश्य काटेकोरपणे पाळली पाहिजे. ती अशी की कोणत्याही परिस्थितीत चुकूनही मद्यमांसाचे सेवन करता कामा नये. राजपुरुषांच्या युद्धाच्या वेळीही सोवळ्या-ओवळ्याचा विचार करून स्वत:चा स्वयंपाक स्वत:च करून खाण्याने नक्कीच पराभव होतो, ही गोष्ट सर्व बुद्धिमंतांनी सांगून ठेवलेली नाही काय ? वस्तुत: क्षत्रियांनी युद्धाच्या वेळी एका हाताने भाकरी खात व पाणी पीत दुसऱ्या हाताने शत्रूवर चढाई करणे आणि घोड्यावर किंवा हत्तीवर बसून अथवा पायउतार होऊन कापाकापी करत विजयी होणे हाच त्यांचा आचार व पराजित होणे हा अनाचार होय. सोवळ्या-ओवळ्याच्या व शिवाशिवीच्या मूर्ख कल्पनांमुळे येथील लोक विरोध करण्याच्या वेळी जेवण्याखाण्याचे सोवळे सांभाळण्यापायी स्वातंत्र्य, आनंद, धन, राज्य,विद्या व पुरुषार्थ यांना पारखे झाले आणि आता सोवळे-ओवळे करीत डोक्याला हात लावून बसले आहेत. काही पदार्थ मिळाले तर ते शिजवून खावेत, अशी इच्छा ते उराशी बाळगून आहेत. परंतु असे स्वस्थ बसून थोडेच काही मिळते ? अशा प्रकारे या सोवळ्या-ओवळ्याने आर्यावर्ताचा सर्वनाश केला आहे. *(पान २६८ - २६९)*

## आपसातील यादवीचा राजरोग

आर्यांनी आपसात एकत्र खाणे-पिणे करण्यामध्ये कसलाच दोष दिसत नाही. जो पर्यंत आर्य लोकांत एकमत होणार नाही, परस्परांचे लाभहानी व सुखदु:खे एकच आहेत असे मानणार नाहीत, तोपर्यंत त्यांची उन्नती होणे फार कठीण आहे. परंतु केवळ खाणे-पिणे एक झाल्याने सुधारणा होऊ शकत नाही. जोपर्यंत वाईट गोष्टी सोडून दिल्या जात नाहीत व चांगल्या गोष्टी केल्या जात नाहीत तोपर्यंत उन्नतीऐवजी अवनतीच होत जाते.

आपसातील फाटाफूट, मतभेद, ब्रह्मचर्याचा अभाव, विद्या न शिकणे व न शिकवणे,

बालविवाह, स्वयंवराच्या विवाहपद्धतीचा त्याग, विषयासक्ती, मिथ्याभाषण, आदी कुलक्षणे, वेदविद्येचा अपप्रचार आदी कुकर्मे या कारणांमुळे आर्यावर्तात विदेशी लोकांची सत्ता प्रस्थापित झाली. जेव्हा भाऊ-भाऊ आपसात भांडतात तेव्हा तिसराच विदेशी येऊन पंच बनतो.

पाच हजार वर्षांपूर्वी घडलेल्या महाभारतातील गोष्टी तुम्ही विसरलात काय ? महाभारतीय युद्ध लढणारे सारे वीर आपापल्या वाहनांवर बसूनच खाणे-पिणे करत असत. आपसातील यादवीमुळेच कौरव, पांडव व यादव यांचा सत्यानाश झाला. तोच यादवीचा रोग अजूनपर्यंत भारतीयांच्या मागे लागला आहे. हा राक्षस आमची मानगूट कधी सोडेल की नाही कोण जाणे. की आर्यांना साऱ्या सुखांपासून वंचित करून तो त्यांना दु:खसागरात बुडवून टाकील ? आपल्या गोत्राची हत्या करणाऱ्या, स्वदेशाचा विनाश करणाऱ्या, नीच व दुष्ट दुर्योधनाच्या दुष्ट मार्गाने आर्य लोक आजही चालले आहेत व आपल्या दु:खात भर घालीत आहेत. परमेश्वराने आम्हा आर्यांवर कृपा करावी व हा राजरोग नष्ट करावा. *(पान २७० - २७१)*

## सर्व संप्रदायांना आवाहन

या देशाची उन्नती व्हावी असे तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही आर्यसमाजाशी सहकार्य करून त्याच्या उद्दिष्टानुसार आचरण करण्यास सुरुवात करा. नाहीतर तुम्ही काहीही करू शकणार नाही. कारण तुम्ही व आम्ही मिळून देशोद्धाराचे काम केले पाहिजे. ज्या देशातील पदार्थांनी तुमची-आमची शरीरे बनली आहेत, आज त्यांचे पालनपोषण होत आहे व यापुढे होणार आहे त्यांची आपण सर्वजण तनमनधनाने व प्रेमाने उन्नती करू या. आर्यावर्ताची उन्नती करण्यास आर्यसमाज जसा समर्थ आहे तसा दुसरा कोणताही समाज, संस्था अथवा संघटना असू शकणार नाही. या समाजाला तुम्ही यथोचित साह्य कराल तर ती फार चांगली गोष्ट होईल. कारण समाजाला भाग्यशाली बनविणे हे समुदायाचे काम असते. ते एकट्यादुकट्याचे काम नसते.

*(अकरावा समुल्लास, पान ३९८)*

# राष्ट्रपुरुषांसंबंधी ज्ञान प्रबोधिनीची अन्य प्रकाशने

| | | |
|---|---|---|
| १) राष्ट्रद्रष्टे विवेकानंद<br>(लेखक : वि. वि. पेंडसे) | आवृत्ती तिसरी २००९ | ₹ १२०.०० |
| २) विवेकानंदांचा राष्ट्रधर्म<br>(लेखक : वि. वि. पेंडसे) | आवृत्ती चौथी २००९ | ₹ ६०.०० |
| ३) श्री माताजी–श्री अरविंद काय म्हणाले ?<br>(लेखक : वि. वि. पेंडसे) | आवृत्ती पहिली १९८२ | ₹ ३५.०० |
| ४) रामदास काय म्हणाले ?<br>(लेखक : गिरीश श्री. बापट) | आवृत्ती दुसरी २००७ | ₹ ६०.०० |

परमेश्वराचे गुण स्वत:मध्ये आणण्याचा माणसाने
प्रयत्न केला पाहिजे म्हणजे मोठी कामे करून त्याने मोठे बनावे.
त्याने समर्थाहून समर्थ बनावे, आपले सामर्थ्य सतत वाढवावे,
कधीही अधर्माचरण करू नये. सर्वांवर दया करावी,
आपल्या प्रगतीची साधने सर्व परिपूर्ण बनवावीत.
तंत्रज्ञानाचा विकास करून नाना प्रकारची उपकरणे तयार करावीत.
साऱ्या जगातील जीवांना आपल्या आत्म्याप्रमाणेच सुखदु:ख होत असते
हे ओळखावे, सर्वांचे रक्षण करावे. विद्वानांमध्ये विद्वान बनावे,
दुष्कृत्ये करणाऱ्या दुष्टांना शिक्षा करावी आणि सज्जनांची
पाठराखणी करावी. अशा प्रकारे परमेश्वराच्या नावांचे अर्थ
जाणून घेऊन परमेश्वराच्या गुणकर्मस्वभावानुसार
आपले गुणकर्मस्वभाव बनविण्याची धडपड करणे
हेच परमेश्वराचे नामस्मरण होय.